❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३०३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

राज्यपाल जिष्णु देव वर्मा

■ नाशिक (दै. संध्या)

युवकांनी व्यसनांपासून दूर राहून चांगल्या सवयी, शिस्त आणि एकाग्रतेच्या बळावर स्वतःचे चारित्र्य घडवावे. स्वतः व्यसनमुक्त राहण्यासोबतच मित्र, सहाध्यायी, कुटुंबीय आणि समाजातील नागरिकांनाही व्यसनमुक्त जीवनासाठी प्रोत्साहित करावे. युवकांच्या सामर्थ्याचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकसित भारत २०४७ साकार करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

मराठा विद्याप्रसारक समाज, नाशिक आणि एस. जे. ए. ॲनालिटिकल लॅबोरेटरी यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महाकवी कालिदास कलामंदिरात आज सकाळी 'सशक्त युवा, सशक्त भारत' अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात राज्यपाल श्री. वर्मा बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, न्या. दिलीप घुमरे, न्या. मदन गोसावी, ॲड महेश सावंत, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे आदी उपस्थित होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी उपस्थितांना व्यसनमुक्त राहण्याची शपथ दिली. शिक्षण म्हणजे केवळ पदव्या मिळविणे नव्हे, तर व्यक्तीचे चारित्र्य घडविणे होय. शिक्षणातून विवेक, शिस्त, चांगल्या सवयी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित झाली पाहिजे. व्यक्तीच्या सवयींमधून त्याचे चारित्र्य घडते आणि चारित्र्यच त्याच्या भविष्याची दिशा ठरवते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी अंगीकारून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे. अमली पदार्थांचे व्यसन हे युवकांसमोरील गंभीर आव्हान आहे. व्यसनामुळे एकाग्रता कमी होते आणि यशाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनमुक्त राहून समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे त्यांनी नमूद केले. आजच्या संधीचा योग्य उपयोग करून युवकांनी स्वतःचे भविष्य घडविण्यासोबतच मित्रांना योग्य दिशा द्यावी आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणावे. राष्ट्रनिर्मिती ही प्रत्येक नागरिकाच्या छोट्या-छोट्या योगदानातून साकार होते.



युवकांची शक्ती ही राष्ट्राची अमूल्य संपत्ती

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेल्या देशांपैकी एक आहे. देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील असून, ही युवा शक्ती विकसित भारताच्या उभारणीसाठी मोठी संधी आहे. युवकांच्या क्षमतेचा योग्य उपयोग झाल्यास विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी भक्कम पाया निर्माण होईल. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून एकाग्रता, शिस्त आणि सकारात्मक विचारांच्या बळावर यश संपादन करावे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी राष्ट्रनिर्मितीसाठी खंबीर मनोबल आणि ध्येयाप्रती समर्पण आवश्यक असल्याचे सांगितले.

विकसित भारताच्या भक्कम पायामध्ये प्रत्येक युवकाने आपल्या कार्याची एक वीट रचावी, असे आवाहन राज्यपालांनी केले. विद्यार्थ्यांनी घेतलेली व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता तिचे आयुष्यभर पालन करावे. स्वतः व्यसनमुक्त राहणे, इतरांनाही व्यसनांपासून दूर राहण्यासाठी मदत करणे आणि समाजात जागरूकता निर्माण करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. 'सशक्त भारतासाठी सशक्त युवा' ही व्यापक लोकचळवळ उभी करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन राज्यपालांनी केले. पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले की, पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कष्ट घेत असतात. त्यांच्या स्वप्नांचा आणि त्यागाचा आदर राखून विद्यार्थ्यांनी चुकीच्या संगतीपासून दूर राहावे आणि व्यसनांच्या प्रलोभनांना बळी पडू नये. अमली पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्याचे गंभीर नुकसान होते. व्यसनाधीनतेमुळे व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यासोबतच संपूर्ण कुटुंबालाही त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

थोडक्यात...

राजकीय पोळी भाजू देणार नाही : रामदास कदम

रत्नागिरी : दैनिक संध्या

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर 500 कोटी रुपयांबाबत केलेल्या आरोपांवरून शिवसेना नेते तथा माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी भाजपवर जोरदार टीका केली होती. यावरून राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. आता या सगळ्या विषयावरून रामदास कदम यांनी प्रसिद्धीपत्रक जारी करून याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी मराठा आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा दिल्याची आठवण करून देत कुणबी समाजात विष पेरून राजकीय पोळी भाजणाऱ्यांना थारा मिळणार नाही, असा इशारा दिला आहे. समाजबांधवांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही आवाहन त्यांनी केलं आहे. रामदास कदम यांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करत आपण कधीही एका बाजूने बोलणे किंवा दुटप्पी भूमिका घेतली नाही. अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे की, कुणबी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम प्रयत्नशील आहोत. त्यामुळे खोट्या आरोपांच्या माध्यमातून समाजामध्ये विष पसरवून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या हाताला काहीही लागणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाय.

मराठवाडा पदवीधरमध्ये राष्ट्रवादीला 'दे धक्का'

संभाजीनगर : दैनिक संध्या

राज्यातील पाच विधानपरिषद निवडणुकांचा निकाल जाहीर झाला असून महायुतीला तीन जागांवर विजय मिळाला, तर महाविकास आघाडीने दोन जागा जिंकल्या आहेत. मात्र, येथील निवडणुकीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघात धक्कादायक निकाल पाहायला मिळाला. मराठवाडा पदवीधर मतदारसंघात सलग तीनवेळा विजय मिळवणारे राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना यंदाच्या निवडणुकीत मोठा राजकीय धक्का बसला. डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी त्यांच्यासमोर कडवं आव्हान उभं केलं होतं. त्यामुळे, हा पराभव केवळ दोन उमेदवारांमधील लढतीचा निकाल नाही, तर 18 वर्षांच्या राजकीय कारकिर्दीचा हिशेब, महायुतीतील अंतर्गत नाराजी आणि जिल्ह्याच्या राजकारणातील बदलती समीकरणांचाही परिणाम असल्याचं दिसतंय. सतीश चव्हाण यांच्या पराभवाचं विश्लेषण करताना विविध कारणमिमांसा केली जातेय. त्यामध्ये, महायुतीमधील अंतर्गत मतभेद, अँटीइन्कम्बन्सी, अपक्ष उमेदवारांना मिळालेली मतं, यासह इतरही महत्त्वाची कारणं आहेत. त्यामध्ये, प्रामुख्याने 6 कारणे दिसून येतील. सलग तीन टर्म आमदार राहिल्यामुळे सतीश चव्हाण यांच्यासमोर यंदा 18 वर्षांच्या कामाचा हिशेब देण्याचं आव्हान होतं. 'इतकी वर्षे प्रतिनिधित्व करून पदवीधरांसाठी नेमकं काय केलं?' हा सवाल विरोधकांनी उपस्थित केला.

कर्जत वृक्षतोडीवरून राज ठाकरे भडकले

■ रायगड (दै. संध्या)

कर्जतच्या सायडोंगर परिसरातील गुजरातच्या टोरेंट कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीकेचा भडीमार केला. हे सगळं महाराष्ट्राला लुबाडण्यासाठी सुरू आहे, मुंबई गुजरातला जोडण्याची मनिषा त्यामागे आहे, असा थेट आरोप राज ठाकरे यांनी केला. तसेच या मुद्द्यावरून त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांना धारेवर धरलं. देवाच्या काठीला आवाज नसतो, ती ज्या दिवशी बसेल त्या दिवशी तुम्ही केलेली पापं आठवतील असं राज ठाकरे म्हणाले. कर्जतमधील जाहीर सभेत राज ठाकरे बोलत होते.

कर्जतमध्ये एवढा मोठा प्रकल्प येत आहे त्याची चर्चा ग्रामसभेत झाली का? ही वीज महाराष्ट्राला मिळणार का? या प्रकल्पामध्ये तयार होणाऱ्या विजेचे वितरण कोणत्या खासगी उद्योगपतीच्या मार्फत केलं जाणार? यासह अनेक प्रश्न राज ठाकरे यांनी विचारले. राज ठाकरे म्हणाले की, "या सगळ्या लोकांचं लक्ष फक्त एमएमआर परिसरावर आहे. मुंबई गुजरातला मिळवायची ही मनिषा त्यामागे आहे, हे त्यांचं दुखणं आहे. उद्या त्यांचेच खासदार, आमदार ते जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत असेल. 2029 साली निवडणुका आहेत. या अडीच तीन वर्षात महाराष्ट्राची काय विल्हेवाट लावतील काय माहिती?" राज ठाकरे म्हणाले की, "पंप स्टोरेज प्रकल्पासाठी, पाणी उचलण्यासाठी वीजच लागते. त्यासाठी वेगळी सोलर उर्जा निर्माण केली आहे का? महाराष्ट्रात डेटा सेंटर येणार आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागते. त्या डेटा सेंटरला वीज पुरवण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे का? कर्जतमधील पंप स्टोरेज प्रकल्पात



वीज तयार झाल्यानंतर त्याचं वितरण कसं होणार आहे? कुठे होणार आहे? फक्त महाराष्ट्रासाठी होणार आहे का? ते कुणाच्या मार्फत होणार आहे? हे महाराष्ट्राला समजलं पाहिजे. ही सगळी व्यवस्था ही खासगी व्यक्तीच्या मार्फत राबवली जाणार आहे. एकाच व्यक्तीसाठी हे सगळं केलं जात आहे." इतका मोठा प्रकल्प होत असताना त्याची चर्चा ही ग्रामसभा, ग्रामपंचायत, विधानसभेत झाली होती का? तशी झाली असेल तर ती माहिती मराठीमध्ये उपलब्ध करून दिली आहे का? केंद्रीय गृहमंत्र्यांवर टीका करताना राज ठाकरे म्हणाले की, मला अमित शाहांना सांगायचं आहे. कुऱ्हाडीचा आवाज येतो, पण देवाच्या काठीचा आवाज येत नाही. ती ज्या दिवशी तुम्हाला बसेल त्या दिवशी कळेल तुम्ही काय काय पापं केलीत. तुम्ही महाराष्ट्रातल्या चांगल्या जागा आहेत त्या ठिकाणचे व्हिडीओ करून टाकता. ते फक्त महाराष्ट्र बघत नसतो तर ते उद्योगपती बघत असतात. मग त्यावर त्या उद्योगपतींची नजर जाते. त्या जागा उद्योगपती विकत घेतात आणि महाराष्ट्राची वाट लावतात. त्यामुळे आपण हे व्हिडीओ आणि जागा कोणाच्या हातात देतो याचं भान ठेवा असं राज ठाकरे म्हणाले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : अखिल भारतीय किसान सभेच्या विविध मागण्यांबाबत बैठक

■ मुंबई (दै. संध्या)

सध्या राज्यात असलेल्या संघर्षमय दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्य शासन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करत आहे.राज्य शासनाच्या मदतीतून हा दुष्काळाचा संघर्ष निश्चितच कमी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखिल भारतीय किसान सभेच्या मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत व्यक्त केला. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार विनोद निकोले उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले अडचणीत असलेल्या उपसा सिंचन योजनांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, या निर्णयाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्यात येईल. या अग्रिमामुळे शेतकऱ्यांना 'एनडीआरएफ'च्या निकषांपेक्षा अधिक मदत मिळणार आहे. दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करून चारा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. नमो शेतकरी सन्मान निधी योजनेचे हप्ते शेतकऱ्यांना देण्यात येतील. नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना शासन प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देत आहे.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ग्राम रोजगार सेवकांचे मानधन ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा न करता त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा करण्याबाबत विभागाने तपासून कार्यवाही करावी. केंद्र शासनाच्या नवीन कामगार कायद्यानुसार बांधकाम कामगारांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनांचे स्वरूप निश्चित करावे. त्यांच्यासाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना सुरू करण्याबाबतही शासन सकारात्मक आहे.

या अनुदानात वाढ करण्याबाबत कर्जमाफीसाठी गठित मंत्रिगट चर्चा करेल आणि आर्थिक परिस्थितीनुसार योग्य निर्णय घेण्यात येईल. नवीन पीक कर्ज देताना सिबिलची अट ठेवू नये, यासाठी रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून सर्व बँकांना पत्र देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसी पूर्ण केलेल्या महिलांना थकीत हप्ता तातडीने देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नवीन लाभार्थी तसेच ई-केवायसी न झालेल्या आदिवासी भागातील महिलांबाबत शासन सकारात्मक विचार करेल. महिलांसाठी योजना राबविणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक महिलांना लाभ दिला जात आहे.

पीक विम्यासाठी पूर्वी लागू असलेले ट्रिगर पुन्हा सुरू करण्याबाबत संबंधित विभागामार्फत तपासणी करून निर्णय घेण्यात येईल. बाळ हिरड्याची आदिवासी विकास महामंडळामार्फत होणारी खरेदी पूर्ववत करावी आणि या उत्पादनाचा किमान आधारभूत दरामध्ये समावेश करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या दरमहा अडीच हजार रुपये मानधनात एक हजार रुपयांची वाढ करण्याबाबत शासन सकारात्मक आहे. पेसा गावांतील मोबिलायझर महिलांचे मानधन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत ग्रामविकास विभागाने तपासणी करून कार्यवाही करावी. संबंधित ग्रामसभांशी चर्चा करून विद्यमान शासन निर्णयांचे एकत्रीकरण करावे आणि दीर्घकालीन विचारातून समर्पक शासन निर्णय काढावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

'महा-इंडस'सह विविध डिजिटल सेवा आणि योजनांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

महाआयडी, महासारथी आणि महाडीबीटीच्या माध्यमातून शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविणार : मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता, एकात्मिक डेटाबेस आणि डिजिटल प्रणालींच्या प्रभावी वापरातून शासकीय कामकाजाची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होणार आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच योजनांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन आणि अपात्र लाभार्थ्यांची पडताळणीही या माध्यमातून अधिक प्रभावीपणे करता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे महासारथी पोर्टलचा आढावा घेण्यात आला. यावेळी 'महाडीबीटी २.०', 'आपले सरकार २.०', 'मैत्री' पोर्टलवरील नवीन सेवा आणि 'महाइंडस' या सुरक्षित एआय प्लॅटफॉर्मचा शुभारंभ करण्यात आला. या बैठकीस मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांच्यासह



विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते. शासकीय कामकाजासाठी एकात्मिक डेटाबेस, एआयचा वापर आणि विविध विभागांतील माहितीचे एकत्रीकरण करण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'महाआयडी'च्या माध्यमातून नागरिकांची माहिती एकत्रित करण्याबरोबरच शासकीय यंत्रणेची कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व वाढविण्यास मदत होणार आहे. शासन निर्णयांच्या मोठ्या संग्रहातून आवश्यक माहिती वेगाने शोधणे, पत्रव्यवहाराचे व्यवस्थापन करणे आणि कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ करणे यासाठी या प्रणालींचा उपयोग होईल. सार्वभौम एआयचा अशा प्रकारे वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी सांगितले. 'महासारथी' हा राज्याचा महत्वाकांक्षी उपक्रम पूर्णत्वाकडे जात असून, त्यातील विविध विभागांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या प्रणालीमध्ये विविध विभागांच्या माहितीचे एपीआय इंटिग्रेशन केल्यास संबंधित डेटाचे सातत्याने अद्ययावतीकरण करणे शक्य होईल. त्यातून योजनांची अंमलबजावणी, निधीचा विनियोग आणि लाभार्थ्यांची पडताळणी अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. विशेषतः वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये योग्य लाभार्थ्यांची निवड, अपात्र लाभार्थ्यांची ओळख आणि योजनांमुळे प्रत्यक्षात साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करण्यासाठी एकत्रित माहितीचा उपयोग होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. 'सर्वम एआय'च्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या 'महा-इंडस' या सुरक्षित एआय प्लॅटफॉर्मचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यात मराठीसह २२ भारतीय भाषांमध्ये मसुदालेखन, भाषांतर, सारांश तयार करणे आणि माहितीचे विश्लेषण करणे शक्य होणार आहे. शासकीय डेटा देशाबाहेर जाणार नाही किंवा एआय मॉडेलच्या प्रशिक्षणासाठी वापरला जाणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

विधानपरिषदेच्या २८ जागांसाठी निवडणूक, बॅलेटपेपरवर मतदान

मोदी म्हणाले, काँग्रेसने किती जागा जिंकल्या, ओळखा?

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील 5 विधानपरिषद आणि इतर तीन राज्यातील एकूण 23 मतदारसंघातील निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले आहेत. त्यामध्ये, महाराष्ट्रात भाजपा महायुतीचे तीन उमेदवार निवडून आले असून महाविकास आघाडीला दोन जागा जिंकता आल्या. त्यामुळे, राज्यातील या निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळाली. विशेष म्हणजे, विधानपरिषदांच्या या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात आल्यामुळे निकालाकडे सर्वांचेच लक्ष होते. त्यातच, भाजपला देखील या विजयातून ईव्हीएमबद्दलच्या आरोपांचे खंडन करण्याची संधी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करुन काँग्रेसला त्याच अनुषंगाने डिवचलं आहे. देशातील काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालात भाजपला भरगोस यश मिळाल्यानंतर विरोधकांकडून हा ईव्हीएमचा विजय असल्याचा आरोप केला जातो. महाराष्ट्रातही विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर महाविकास आघाडीने ईव्हीएमवर शंका उपस्थित केल्या होत्या. तसेच, ईव्हीएम हटाओ, देश बचाओ...



असा नाराही काँग्रेसकडून विरोधकांकडून दिला जातो. ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी देखील सातत्याने होत आहे. त्याच, पार्श्वभूमीवर 4 राज्यातील विधानपरिषद निवडणुकांच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करुन काँग्रेसला लक्ष्य केलं. महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि बिहार या चार मोठ्या राज्यातील 28 जागांसाठी विधानपरिषद निवडणूक, बॅलेटपेपरवर मतदान तरी काँग्रेसने किती जागा जिंकल्या, ओळखा पाहू? असा प्रश्न मोदींनी ट्विटरवरुन उपस्थित केला. तसेच, भाजपच्या अधिकृत ट्विटर हँडलवरुनही तोच सवाल उपस्थित करत काँग्रेसवर टीका करण्यात आलीय.

संपादकीय

द्वेषाने दुभंगत चाललेला समाज

धर्म, जात प्रांत, भाषा, संस्कृती अशा विविधतेने नटलेल्या आपल्या देशातील लोकांमध्ये भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय या मूल्याबाबत लोकशाही धर्मनिरपेक्षता ही मूल्येही रूजवली, परिणामी " विविधतेतून एकता" हा लौकीक आपण सर्वजण अभिमानाने गौरवीत होतो, परंतु गेल्या काही वर्षात देशात फुटीरतेची,विद्वेषाची पेरणी सुरू असल्याचे दिसत आहे, धार्मिक विद्वेषाच्या आधारे आणि मताचे ध्रुवीकरण करून देशात सत्तेचे परिवर्तन झाले, संवैधानिक मूल्यांना प्रशासनाच्या आशीर्वादाने पद्धतशीरपणे मुठमाती दिली जात असल्याचे विदारक चित्र दिसत आहे, धार्मिक,असहिष्णता आणि विश्वाने जे स्वरूप धारण केले आहे ते पाहून देशातील संवेदनशील शांतता प्रेमी देश प्रेमी नागरिक अस्वस्थ झालेले दिसत आहे,हा विद्वेष धर्माच्या, जातीच्या, सीमा ओलांडून जात भाषा, प्रांत, राजकीय निष्ठा, यामध्ये झिरपत चाललेला आहे. या विद्वेषाने समाजमन दुभंगलेले आहे,परिणामी देशातील सामाजिक सलोखा, ऐक्य, एकात्मता, धोक्यात येते की काय?अशी शंका सर्वसामान्य नागरिकांमध्ये डोकावून गेलेली आहे. विद्वेष पसरवण्यासाठी लोकांना विरोधकाची किळस येईल, भीती वाटेल, त्यांचा राग येईल, असे काहीतरी बनावट निगेटिव्ह तयार करून ते लोकांच्या गळी उतरवायचे, अशीही गोंडस वाटचाल आहे, असे दिसून येते, याचाच एक भाग म्हणजे हिंदू धर्म, सनातन धर्म, धोक्यात असल्याची हूल उठवून अल्पसंख्यांका विषयी विद्वेष पसरविणे, विशेष म्हणजे सुमारे सात-आठशे वर्षे बिगर हिंदू राजवटीत सगळेच धर्म पूर्णपणे सुरक्षित राहिलेले आहे, हा विद्वेष आधी कानोकानी कुजबूज मोहिमेतून पध्दतशीरपणे पसरवला जात होता आणि आजही होत आहे, पण देशात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर या विद्वेषी लोकांची हिम्मत वाढली आहे, त्यांचा भेसूर व भयानक चेहरा वेळोवेळी समाजाच्या दृष्टीपथास येत आहे. राजकीय क्षेत्राबद्दल तर बोलायलाच नको आपला राजकीय विरोधक म्हणजे आपला शत्रू? हे नॅरेटिव्ह वापरून सत्ताधारी राजकीय पक्षाने आणि त्याच्या संघटनेने आपल्या अनुयायांमध्ये विरोधकाविषयी एवढा मत्सर. द्वेष पसरवलेला आहे, व पेरलेला आहे? की विरोधकांनी रास्त टीका केल्यावरही त्यांना देशद्रोही ठरवले जाते, विरोधकांना नामोहरम करण्यासाठी राजकीय मुद्द्याचा वापर न करता त्यांच्याविषयी तिरस्कार निर्माण व्हावा म्हणून हे विरोधक कसे समाजविरोधी आहेत?हे कसे हिंदू विरोधी आहेत? त्यांना आपला देशखड्ड्यात घालावयाचा आहे?अशा कपोकल्पित कहाण्या रचल्या जातात, कधी कधी नेहरू हे हिंदू विरोधी आहेत?त्यांनी देश कसा खड्ड्यात घातला? याच्या कहाण्या वेगवेगळ्या पध्दतीने पध्दतशीर रंगवल्या जात आहेत, व दररोज रचल्या जात आहेत, तसेच नेहरू हे मुसलमान होते? असे ठसवून सिध्द करण्यासाठी त्यांची नकली वंशावळ निर्माण केली जाते, महिलांचे चारित्र्यहनन हा तर एक हुकमी एक्का बनवलेला आहे, सरकार विरोधात बोलणाऱ्या नेहा सिंग राठोर या लोकसेविकेची एका प्रमुख टीव्ही चॅनेलने खोटी बातमी प्रसारीत करून केलेले चारित्र्यहनन, आणि नंतर मागितलेली माफी, हे प्रकरण अगदीच ताजे आहे, सोनिया गांधी यांच्या विषयी देशाच्या जबाबदार नेतृत्वाने काढलेले घृणास्पद उद्गार याची साक्ष देतात, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जातीत जन्मले होते म्हणून त्यांचा आणि संविधानाचा तिरस्कार केला जातो, शोषितांचा विद्वेष तर सरकारच्या आणि त्याच्या समर्थकांच्या उक्ती आणि कृतीमधून ठळकपणे जाणवतो, दसऱ्याच्या दिवशी राक्षस दहना सोबत झुरळ दहन करण्याची संकल्पना याची पुष्टी करते, विरोधकांना अर्बन नक्षल. अशी लेबले लावून त्यांचा शक्य तेवढा तिरस्कार केला जातो, हा विद्वेष लोकांमध्ये एवढा घट्ट रुतून बसला आहे की विरोधकाच्या मृत्यूबद्दल व व्यक्तीगत क्लेशदायक घटनेबद्दल आनंद व्यक्त केला जातो, विरोधी विचाराच्या राज्यातील अन्य जाती धर्मातील महिलेवर अत्याचार झाल्यास सोईस्कर मौन बाळगले जाते, एवढेच नाही तर अशा अत्याचार करणाऱ्याचा सन्मान केला जातो, त्याला महत्त्वाचे पद दिले जाते, हे अत्यंत गंभीर असून देशाच्या ऐक्याला, एकात्मतेला सामाजिक सलोख्याला तडा देणारे आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते जर आपण एक राष्ट्र म्हणून टिकून राहू इच्छित असो तर आपण आपल्यात सामाजिक, आणि आणि आर्थिक समता आणली पाहिजे, जातीयतेमुळे दुभंगलेला समाज कधीही एक मजबूत देश बनू शकत नाही, सरदार वल्लभभाई पटेल यांनाही भविष्याचा अंदाज आला असावा म्हणून की काय ते म्हणाले होते, आपल्याच अंतर्गत मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतु जेव्हा देशाच्या अखंडतेचा प्रश्न येतो तेव्हा आपण सर्वजण एक असले पाहिजे कारण दुही व विभाजन झालेले राष्ट्र गुलामगिरी च्या खाईत लोटले जाते. दुभंगलेला समाज कधीही राष्ट्र कधीही राष्ट्र घडवू शकत नाही, म्हणून ही परिस्थिती सुधारण्यासाठी बंधूता, आणि धर्मनिरपेक्षता ही मूल्ये पुनश्च स्थापित करण्यासाठी सर्वांनी विशेषतः सत्ताधारी पक्षाने आणि त्यांच्या संघटनेने व विरोधी पक्षाने पक्षहितापेक्षा देशाला प्राधान्य देऊन हे देशावरचे संकट दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत, सरदार वल्लभभाई पटेल यांनी व्यक्त केलेले मत प्रत्यक्षात येऊ नये यासाठी सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांनी एकत्रित येऊन विचार विनिमय करून देशाच्या एकात्मतेला प्राधान्य देण्यासाठी ठोस प्रयत्न केले पाहिजे.

थोडक्यात पण महत्वाचे



अजितदादांच्या विमान अपघाताच्या तपासाला गती देण्याची मागणी

पुणे : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते श्री.जय अजितदादा पवार यांनी आज पुण्यातील कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी तपासाची सद्यस्थिती,आतापर्यंत झालेली कार्यवाही, तपास पूर्ण होण्यासाठी लागणारा संभाव्य कालावधी तसेच तपासातील प्रलंबित बाबींबाबत अधिकाऱ्यांकडे सविस्तर विचारणा केली.या प्रकरणाचा तपास अधिक गतिमान करून तो पारदर्शकपणे आणि विनाविलंब पूर्ण करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. "अजितदादांच्या विमान अपघातामागील सत्य समोर येणे हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून,दादांवर अपार प्रेम करणाऱ्या लाखो नागरिकांच्या विश्वासाचा विषय आहे," अशी भूमिका जय अजितदादा पवार यांनी यावेळी मांडली. या अपघाताबाबत जनतेच्या मनात असलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळणे, तपासातील प्रत्येक महत्त्वाच्या बाबीचा सखोल तपास होणे आणि सत्य जनतेसमोर येणे अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे तपासात कोणतीही दिरंगाई न होता सर्व संबंधित बाबींची गांभीर्याने चौकशी करून दोषींना जबाबदार धरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही व्हावी,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी त्यांच्यासोबत आमदार श्री.विक्रम काकडे उपस्थित होते.

युपीएससी-स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सेमिनार उत्साहात संपन्न

■ शारदानगर (दै. संध्या)



स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून स्पष्ट ध्येय,कठोर परिश्रम,सातत्य,स्वयंशिस्त आणि योग्य अभ्यास नियोजन अत्यंत आवश्यक आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या बळावर ते राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये निश्चितच यश संपादन करू शकतात,असे प्रतिपादन भारतीय तटरक्षक दलातील माजी डेप्युटी कमांडंट तथा भारतीय वनसेवा परीक्षा २०२५ मध्ये देशात द्वितीय क्रमांक प्राप्त केलेले श्री. अंशुमन कुमार सिंह यांनी केले. ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या डॉ.शरदचंद्र पवार कृषी व संलग्न शास्त्रे महाविद्यालयातील ॲग्रीकल्चर कॉम्पिटिटिव्ह फोरम आणि वाजीराम अँड रवी- इन्स्टिट्यूट फॉर आयएएस एक्झामिनेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित"फ्रॉम कॅम्पस टू सिव्हिल सर्व्हिसस: युअर रोडमॅप टू सक्सेस" या विषयावरील युपीएससी मार्गदर्शन सेमिनारमध्ये ते बोलत होते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री.सिंह यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीतील स्वतःचे अनुभव,अभ्यासातील सातत्य,अपयशातून शिकण्याची वृत्ती आणि मानसिक तयारीचे महत्त्व विशद केले.स्पर्धा परीक्षेची तयारी म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचा मार्ग नसून व्यक्तिमत्त्व विकास,नेतृत्वक्षमता आणि समाजाप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी प्रक्रिया आहे,असे त्यांनी सांगितले. यावेळी वाजीराम अँड रवी- इन्स्टिट्यूट फॉर आयएएस एक्झामिनेशन संस्थेचे कृषी विषयातील तज्ज्ञ प्राध्यापक श्री.कृष्णा भोकरे यांनी UPSC परीक्षेचे स्वरूप, पूर्वपरीक्षा,मुख्य परीक्षा,मुलाखत प्रक्रिया,अभ्यासक्रमाचे विश्लेषण, योग्य संदर्भग्रंथांची निवड आणि उत्तरलेखन कौशल्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कृषी पदवीधरांसाठी उपलब्ध असलेल्या प्रशासकीय सेवेतील संधी स्पष्ट करताना त्यांनी कृषी विषयाच्या वैकल्पिक विषय म्हणून असलेल्या महत्त्वावर विशेष भर दिला. मर्यादित अभ्यासासाहित्याचा सखोल अभ्यास,नियमित उजळणी,चालू घडामोडींचे विश्लेषण आणि सराव चाचण्या ही स्पर्धा परीक्षेतील यशाची प्रमुख सूत्रे आहेत,असे त्यांनी नमूद केले. कृषी क्षेत्रातील संशोधक व शास्त्रज्ञ बनू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयसीएआर-एनआयएएसएम (ICAR-NIASM), बारामती येथील वनस्पती शरीरक्रियाशास्त्र विभागाचे कृषी वैज्ञानिक डॉ.पांडुरंग दिवटे यांनी विद्यार्थ्यांना कृषी संशोधन सेवा (ARS) परीक्षेच्या तयारीबाबत सखोल मार्गदर्शन केले.ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन मा.राजेंद्र पवार,विश्वस्ता तथा सचिव सौ.सुनंदा पवार,संस्था समन्वयक,मानव संसाधन अधिकारी,सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य आणि उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली या सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, कौशल्यविकास व करिअर मार्गदर्शन उपक्रम ॲग्रीकल्चर कॉम्पिटिटिव्ह फोरमच्या वतीने सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले.या मार्गदर्शन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना UPSC परीक्षेविषयी असलेल्या शंकांचे निरसन करण्यासह स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळाली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील करिअरच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यात स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करणे आणि सक्षम प्रशासकीय अधिकारी घडविण्यास प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलींना रिफ्लेक्टरचा अभाव

- अपघाताचा धोका वाढला!
- रात्रीच्या अंधारात ट्रॉली दिसत नसल्याने दुचाकीस्वारांसह वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

■ वालचंदनगर (दै. संध्या)



इंदापूर व बारामती तालुक्यातील साखर कारखाने सुरू झाल्याने ऊस वाहतुकीला वेग आला आहे. मात्र, रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक ट्रॅक्टरच्या ट्रॉलींना रेडियम रिफ्लेक्टर नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे रस्त्यावर बंद पडलेली किंवा पंक्चर झालेली ट्रॅक्टरची ट्रॉली अंधारात वाहनचालकांना सहज दिसत नसून अपघातांचा धोका वाढला आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार तसेच इतर वाहनचालकांना रस्त्यावर चाललेली किंवा उभी असलेली ट्रॉली वेळेत दिसली नाही, तर गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः ऊस वाहतुकीदरम्यान ट्रॅक्टरची ट्रॉली बंद पडल्यास किंवा पंक्चर झाल्यास, तिच्या मागील बाजूस रिफ्लेक्टर नसल्यामुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना तिचा अंदाज येत नाही. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असताना ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढते. त्यामुळे ट्रॅक्टरच्या ट्रॉलींना पुढील व मागील बाजूस तसेच आवश्यक ठिकाणी रेडियम रिफ्लेक्टर लावणे गरजेचे आहे. तसेच रात्रीच्या वेळी ट्रॉली रस्त्यावर बंद पडल्यास वाहनचालकांना पूर्वसूचना मिळण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित साखर कारखाना प्रशासन, वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रिफ्लेक्टर नसलेल्या ट्रॉलींबाबत तपासणी करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

आळेफाटा परिसरात बिबट्यांचा वावर वाढला; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

■ आळेफाटा (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील व आळेफाटा परिसरातील राजुरी, आळे, वडगाव आनंद, बोरी बुद्रुक, बोरी खुर्द, संतवाडी, कोळवाडी आणि आगरमळा या गावांमध्ये बिबट्यांचा वावर वाढला आहे. नागरिकांना वारंवार बिबट्याचे दर्शन होत असून, पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांच्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बोरी बुद्रुक येथे मंगळवारी रात्री कामावरून घरी परतणारे रखमा रामभाऊ शिंदे यांच्यावर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला दुखापत झाली. याच गावातील गावठाण परिसरात सुमारे पंधरा दिवसांपूर्वी जयश्री पवार या सतरा वर्षीय मुलीवर बिबट्याने हल्ला करून तिला जखमी केले होते. तसेच, वडगाव आनंद येथील पांढरमळा परिसरात शेतात ऊसतोड सुरू असताना बिबट्याची तीन लहान पिल्ले आढळून आली. त्यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. सध्या परिसरात ऊसतोडणीचा हंगाम सुरू झाला आहे. ऊसशेतीत लपून बसलेले बिबटे बाहेर पडून मानवी वस्तीजवळ येत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतात काम करणारे शेतकरी, शेतमजूर तसेच रात्री-अपरात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीती वाढली आहे.

सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टतर्फे लोणी भापकर येथे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन



■ लोणी भापकर (दै. संध्या)

पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्ट,लोणी भापकर यांच्या वतीने दर रविवारी विविध समाजोपयोगी व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येतात.याच उपक्रमाचा एक भाग म्हणून रविवारी (दि. २५ ऑक्टोबर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणी भापकर येथे नवीन झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.तसेच यापूर्वी लावण्यात आलेल्या झाडांची छाटणी करून त्यांची योग्य निगा राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या.झाडांना पुरेसे पाणी मिळावे आणि त्यांची चांगली वाढ व्हावी, यासाठीही विशेष काळजी घेण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण, वृक्षसंवर्धन आणि समाजामध्ये निसर्गाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.या कामासाठी सुपर ट्रेकर्स वेल्फेअर ट्रस्टचे सर्व सदस्य यांनी रविवारी सकाळी उपस्थित राहून श्रमदान केले. "वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.पर्यावरण संवर्धन आणि समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा यापुढेही सुरू ठेवण्यात येईल," अशी माहिती ट्रस्टचे सदस्य गणेश अमराळे यांनी दिली.

आशा स्वयंसेविकांचा 'नवदुर्गा सन्मानपत्र' देऊन गौरव

जनजागृती सेवा संस्थेचा उपक्रम; आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा केला सन्मान

■ बदलापूर (दै. संध्या)



नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या कार्यरत आशा स्वयंसेविकांचा 'नवदुर्गा सन्मानपत्र' देऊन गौरव करण्यात आला. संयोग अपार्टमेंट, झेंडा चौक, बदलापूर पश्चिम येथे हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर आणि जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते आशा स्वयंसेविकांना आकर्षक पेन, गुलाबपुष्प आणि 'नवदुर्गा सन्मानपत्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या आशा स्वयंसेविकांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी दिलीप नारकर यांनी आरोग्य विभागातील शासन निर्णय, आशा स्वयंसेविकांच्या विविध मागण्या आणि त्यांच्या प्रश्नांबाबत शासनाची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. आशा स्वयंसेविकांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित करताना, शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यास कायदेशीर मार्गाने संघर्ष कसा करावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी जनजागृती सेवा संस्थेच्या कार्याचा आढावा घेत संस्थेच्या आगामी वाटचालीविषयी माहिती दिली. ज्येष्ठ आशा स्वयंसेविका संजीवनी पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळातील अनुभव कथन केले. आशा स्वयंसेविका ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. माता-बाल आरोग्य, आरोग्यविषयक जनजागृती आणि शासकीय आरोग्य योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, नवरात्रोत्सवाच्या काळात संस्थेच्या वतीने ऑनलाइन पद्धतीनेही महिलांना ई-'नवदुर्गा सन्मानपत्र' पाठविण्यात आले. महिलांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे महत्त्व यानिमित्ताने अधोरेखित झाले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

सामाजिक समता, शैक्षणिक प्रगती आणि बंधुभावासाठी एकजुटीने कार्य करा!

कासणे येथे भव्य धम्ममेळावा उत्साहात संपन्न; विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते अजिंठा प्रवेशद्वाराचे उद्घाटन

■ भिवंडी (दै. संध्या)



भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता, करुणा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा जागर करण्याच्या उद्देशाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कासणे येथे भव्य धम्ममेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दीपंकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, कासणे यांच्या वतीने आयोजित या धम्ममेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सोहळ्यात महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते अजिंठा प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले.

"सामाजिक समता, शैक्षणिक प्रगती, बंधुभाव आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करणे आवश्यक आहे," असे आवाहन विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी यावेळी केले. भगवान गौतम बुद्धांनी जगाला दिलेला शांती, करुणा, प्रज्ञा आणि समतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि बंधुतेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. या महापुरुषांचे विचार केवळ स्मरणापुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या आचरणात आणणे, समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून नव्या पिढीला सक्षम करणे, ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बनसोडे यांनी केले. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी, सन्मान आणि न्याय मिळवून देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे सांगत, धम्मविचारांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहनही त्यांनी केले. अशा धम्ममेळाव्यांमुळे भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार होण्याबरोबरच सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि वैचारिक प्रबोधनाला चालना मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

कासणे येथे आयोजित या धम्ममेळाव्याच्या निमित्ताने अजिंठा प्रवेशद्वाराचे उद्घाटन हा कार्यक्रमातील महत्त्वाचा टप्पा ठरला. या उपक्रमातून धम्मपरंपरा, ऐतिहासिक वारसा आणि प्रबोधनाच्या विचारांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला माजी सामाजिक न्यायमंत्री तथा आमदार राजकुमार बडोले, माजी कुलगुरू डॉ. सी. डी. नाईक, आमदार शांताराम मोरे, आमदार दौलत दरोडा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष सुनील मगरे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक आणि धम्म क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. भगवान बुद्धांचा मानवतावादी विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प या धम्ममेळाव्याच्या माध्यमातून अधोरेखित झाला. सामाजिक सलोखा, शैक्षणिक उन्नती आणि सर्वसमावेशक विकासासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा संदेश देत हा धम्ममेळावा उत्साहात संपन्न झाला.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



महर्षी वाल्मिकी जयंती साजरी केली नसल्याने जाहीर निषेध

पुणे : दैनिक संध्या

जगद्गुरु महर्षी वाल्मिकी यांची जयंती बिबेवाडी क्षेत्रीय कार्यालय मध्ये साजरी केली नसल्याने त्याचा जाहीर निषेध म्हणून हॅप्पी टू हेल्प संस्था व लोकहित युवा संघटना यांच्या वतीने पुणे महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांच्याकडे निवेदनाद्वारे देण्यात आले. महर्षी वाल्मिकी ऋषी हे भारतीय संस्कृतीचे महान आद्यकवी असून त्यांच्या जयंतीला योग्य सन्मान मिळणे ही प्रशासनाची सामाजिक व सांस्कृतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी व दोषींवर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कुणाल हरीश करोते, माझी स्वीकृत नगरसेवक विनोद निनारीया, शैलेंद्र चव्हाण, महेंद्र गोगल, साजिद शेख, पंकज बांबोरी ,प्रतीक नीनारिया आदी उपस्थित होते.

‘पीसीईआरएफ’च्या मानद सचिवपदी इंजि. रामनाथ भट यांची नियुक्ती



पुणे : दैनिक संध्या

इंजि. रामनाथ भट यांची पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स अँड रिसर्च फाउंडेशनच्या मानद सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. फाउंडेशनचे मावळते मानद सचिव आर्किटेक्ट शिरीष केंभावी यांनी इंजि. रामनाथ भट यांच्याकडे मानद सचिव पदाचा औपचारिक कार्यभार सुपूर्द केला. फाऊंडेशनच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत ही नियुक्ती करण्यात आली. बैठकीला पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स अँड रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष इंजि. नरेंद्र कोठारी, उपाध्यक्ष इंजि. जयंत इनामदार आणि इंजि. संजय वायचळ, मानद खजिनदार इंजि. जयदीप राजे, तसेच कार्यकारी समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. १९८३ मध्ये स्थापन झालेली पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाउंडेशन ही संस्था बांधकाम आणि बांधकाम संबंधित क्षेत्रांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. संशोधन व नवोपक्रम, तांत्रिक प्रशिक्षण व कौशल्य विकास, बांधकाम सुरक्षा, विद्यार्थी विकास तसेच उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य या क्षेत्रांत संस्था विविध उपक्रम राबवते. बांधकाम क्षेत्राची सर्वांगीण प्रगती, ज्ञानवृद्धी यांसाठी संस्था सातत्याने काम करते.



रविवारी वेदद्रीष्टी फाऊंडेशन व ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्राचा पदवी सोहळा

पुणे : दैनिक संध्या

वेदद्रीष्टी फाऊंडेशन व ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र, पुणे या संस्थेतर्फे षष्ठम पदवी प्रदान सोहळा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन रविवार, दिनांक १ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. पद्मावती येथील विणकर सभागृह येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्योतिष वास्तू विशारद वेदमूर्ती उमेश कुलकर्णी गुरुजी यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोहळ्यात महाराष्ट्रासह देश-विदेशातील विविध वयोगटांतील, संस्थेच्या विविध अभ्यासक्रमांतून शिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. सकाळी १० वाजल्यापासून मुख्य पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. यामध्ये वास्तुविशारद, अंकविशारद, वास्तुभूषण, भवनशास्त्र प्रवीण, स्वप्नशास्त्र प्रवीण, पंचांग प्राज्ञ आणि लोलक विशारद या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रसंगी वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र, अध्यात्म व भारतीय ज्ञानपरंपरेतील मान्यवर, तज्ञ आणि अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणा-या मान्यवरांना प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. शास्त्राधिष्ठित शिक्षणाचा प्रसार आणि गुणवंत विद्यार्थी घडविण्याच्या कार्यासाठी वेदमूर्ती मंदार मधुकर जोशी यांना रत्नमाला पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी हा पुरस्कार डॉ. दिलीप नेमीचंद नहार आणि पंचांगकर्ते मोहन दाते यांना प्रदान करण्यात आले होते. वैदिक वाङ्मयातील अध्ययन, चिंतन व लेखनात्मक योगदानाबद्दल प्रतिभा प्रभाकर भालेराव यांना शारदा पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात येणार आहे. यापूर्वी वास्तुगुरू नरेंद्र सहस्रबुद्धे, विद्यावाचस्पती डॉ. स्वानंद पुंड आणि गुरुश्री प्रिया मालवणकर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

सॅप इंडियाचा मोठा कौशल्यविकास उपक्रम; २० लाख लोकांना एआय प्रशिक्षण देणार

पुणे : दैनिक संध्या

सॅप इंडियाने भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डिजिटल कौशल्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन २०३० पर्यंत देशातील २० लाख लोकांना भविष्यातील रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांनी सज्ज करण्याच्या योजनेला अधिक व्यापक करण्याची घोषणा केली आहे. शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा, उद्योग क्षेत्रातील भागीदार आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून एआय, क्लाउड, डेटा आणि एंटरप्राइज तंत्रज्ञानातील कौशल्ये विकसित करून रोजगाराच्या नव्या संधींसाठी मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. भारतामध्ये जागतिक स्तरावरील स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) क्षेत्रातील कर्मचाऱ्यांपैकी २८ टक्के, तर सॉफ्टवेअर इंजिनिअर्सपैकी २३ टक्के कर्मचारी असल्याचे सॅपने नमूद केले आहे. तसेच, जगभरातील सॅप प्रमाणित शिक्षार्थींपैकी ४८ टक्के भारतातील असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील तंत्रज्ञानविषयक कौशल्यविकासाला गती देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. जागतिक स्तरावर २०३० पर्यंत १ कोटी २० लाख लोकांना एआयशी संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करण्याचे सॅपचे उद्दिष्ट आहे. सॅपच्या भारतीय उपखंडाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मनीष प्रसाद यांनी सांगितले की, भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राची खरी ताकद येथील मनुष्यबळात आहे.

क्वांटम तंत्रज्ञानावर भर दिल्यास देशाचा विकास अधिक वेगाने होईल

डॉ. अरविंद नातू यांचे प्रतिपादन; पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन



■ पुणे (दै. संध्या)

"मागील काही वर्षात तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. भारत म्हणून आपण क्वांटम टेक्नॉलॉजीमध्ये काही प्रमाणात मागे आहोत. पण येत्या काळात या तंत्रज्ञानावर भर दिल्यास आपला वेगाने विकास होईल. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आंतरविद्याशाखीय अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. बायोमेडीकल इंजिनिअरींग, मटेरीयल इंजिनिअरींग आणि मेटलर्जी यांसारख्या शाखांची व्याप्ती मोठी असून, त्यात काम व्हायला हवे," असे प्रतिपादन भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे सल्लागार व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांनी केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयामध्ये 'ॲडवान्सेस इन इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट' या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. नातू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अलिकॉन ग्रुपचे स्ट्रॅटेजिक बिझनेस डेव्हलपमेंट प्रमुख हर्षवर्धन गुणे, एज्युलॅब ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक केन यानागिनोउची, पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक राजेंद्र कडूसकर, माजी अध्यक्ष व संचालक सुनील रेडेकर, इंजिनिअरींग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदिप पाटील व परिषदेचे संयोजक डॉ. रविंद्र एदलाबादकर व डॉ. मनमोहन भूमकर उपस्थित होते. डॉ. अरविंद नातू म्हणाले, "जनरेशन झीने नव्याने येणारे तंत्रज्ञान आत्मसात करायलाच हवे, नाहीतर त्यांचा टिकाव लागणे अवघड होईल. आता इंडस्ट्री ५.० वेगाने विकसित होत असून, ती मानवकेंद्रित आहे. एआय आल्यामुळे अनेकांच्या नोकऱ्या जातील, कौटुंबिक आयुष्य खराब होईल असे बोलले जात होते. हे काही प्रमाणात खरे असले तरी आपण या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेतले तर आपण नक्कीच पुढे जाऊ शकतो. यासाठी आपल्याकडे इच्छाशक्ती, क्रियाशीलता यांसारख्या गोष्टी असायला हव्यात."

हर्षवर्धन गुणे म्हणाले, "आज जागतिक व्यासपीठांवर किंवा विविध चर्चांमध्ये भारताबद्दल एक गोष्ट प्रामुख्याने सांगितली जाते, ती म्हणजे जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारत हा अत्यंत ठाम भूमिका घेणारा देश आहे. भारताची वाढती ताकद, तंत्रज्ञान क्षेत्रातील महासत्ता बनण्याच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल आणि देशातील तरुणांची मोठी लोकसंख्या या बाबी भारताचे भविष्य घडवत आहेत. अवकाश तंत्रज्ञान आणि अवकाश क्षेत्रातील उत्पादननिर्मिती हे आता एक मोठे आर्थिक क्षेत्र बनले आहे."

राजेंद्र कडूसकर यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय परिषदेमागची भूमिका स्पष्ट केली. दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ही परिषद होत आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात संशोधक, नवनिर्माते, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात समन्वय होण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांतील विषयांवर सविस्तर चर्चा व्हावी, संशोधन प्रकल्प सादर व्हावेत, हा या परिषदेचा हेतू असल्याचे ते म्हणाले. सुनील रेडेकर यांनी पुणे विद्यार्थी गृहाच्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. संदिप पाटील यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाबाबत विस्ताराने माहिती दिली. परिषदेसाठी निवड झालेल्या १५६ संशोधन प्रकल्पांच्या पुस्तिकेचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. दुसऱ्या सत्रात हर्षवर्धन गुणे व केन यानागिनोउची यांनी उपस्थितांशी संवाद साधला. डॉ. मधुरा महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर डॉ. मनमोहन भूमकर यांनी आभार व्यक्त केले.

बहुशाखीय शिक्षणाची गरज : गुणे

महत्त्वपूर्ण खनिजे आणि दुर्मीळ मृदा मूलद्रव्ये याबद्दल फारच कमी जणांना माहिती आहे. ही क्षेत्रे जागतिक स्तरावर उदयास येणारी महत्त्वाची क्षेत्रे आहेत आणि पीव्हीजीसारख्या वारसा असलेल्या शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी पूर्णपणे जोडले गेले पाहिजे. केवळ वाहन उद्योग किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रावर लक्ष केंद्रित न करता देशाच्या गरजा आणि प्राधान्यक्रम लक्षात घेऊन अभ्यासक्रम विकसित केले पाहिजेत. नव्या युगातील उद्योगक्षेत्र केवळ एका शाखेवर अवलंबून नाही. यामध्ये यांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि इतर विविध शाखांतील ज्ञान व कौशल्यांचा एकत्रित वापर होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बहुविद्याशाखीय ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे हर्षवर्धन गुणे यांनी नमूद केले.



थॉमस मेहलर यांनी मांडली साउथको इंडियाची वाढती भूमिका

■ पुणे (दै. संध्या)

साउथकोचे अध्यक्ष थॉमस मेहलर यांनी पुण्यातील विमान नगर येथील कंपनीच्या कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला आणि कंपनीच्या जागतिक कामकाजात भारताची भूमिका कशी वाढत आहे, हे स्पष्ट केले. त्यांच्या सादरीकरणात तीन घडामोडी एकत्र आल्या: स्थानिक उत्पादनाचा मजबूत पाया, यंदा भारतात स्थापन झालेले जागतिक क्षमता केंद्र आणि आखाती बाजारपेठांतील साउथको व दर्शना यांची उपस्थिती. साउथको इंडियाचे कंट्री हेड प्रकाश टी. जॉन आणि व्यवसाय विकासाचे महाव्यवस्थापक वीरेश मनराय हेही पत्रकार परिषदेत सहभागी झाले. मेहलर यांच्यासाठी भारतातील या कामाशी त्यांचा स्वतःचा जुना संबंध आहे. त्यांनी १९९० मध्ये साउथकोमध्ये काम सुरू केले. २०१६ मध्ये अध्यक्ष होण्यापूर्वी त्यांनी युरोप, आशिया प्रशांत आणि अमेरिका या विभागांतील कंपनीच्या व्यवसायाचे नेतृत्व केले. आशिया प्रशांत विभागाची जबाबदारी सांभाळताना साउथको इंडियाच्या सुरुवातीवरही त्यांनी देखरेख केली होती. त्यामुळे पुण्यातील त्यांची भेट ही त्यांनी उभारण्यात हातभार लावलेल्या भारतीय व्यवसायाच्या पुढील भूमिकेवर बोलण्याची संधी ठरली.

माधुरी दीक्षितसमोर गौतमी पाटीलचा ठसका!

‘पाटलांचा बैलगाडा’ गाण्यावर हॉटसीटवरच धरला भन्नाट ठेका!

■ पुणे (दै. संध्या)

“आपल्याला खेळ आता कातिल करायचा आहे!” असं म्हणत माधुरी दीक्षित गौतमी पाटील आणि शिव ठाकरे यांच्यासोबतच्या गप्पांना सुरुवातीलाच रंगत आणणार आहे. सोनी मराठीवरील ‘कोण होणार करोडपती’च्या आगामी भागात हे दोघे हॉटसीटवर विराजमान होणार आहेत. माधुरीचं दिलखुलास सूत्रसंचालन, पाहुण्यांचे रंगतदार किस्से आणि तिच्याच फर्माइशीवर गौतमी सादर करणार असलेली ‘पाटलांचा बैलगाडा’ची हुकस्टेप, अशा मनोरंजनानं भरलेल्या मैफलीचा आनंद प्रेक्षकांना घेता येणार आहे. ‘कोण होणार करोडपती’मध्ये सचिन पिळगावकर, मधुराणी गोखले, रेणुका शहाणे, प्रिया बेर्डे आणि ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’च्या कलाकारांसोबतच्या मनमोकळ्या गप्पांमधून माधुरीनं अनेक खास क्षण खुलवले आहेत. आता गौतमी आणि शिवसोबतही तिचा तितकाच सहज



आणि खेळकर अंदाज पाहायला मिळणार आहे. निळ्या रंगाची नऊवारी साडी नेसून आलेल्या गौतमीच्या मराठमोळ्या लूकचं माधुरी कौतुक करणार असून, शिवच्या सहभागानं या गप्पांना आणखी रंग चढणार आहे. या भेटीतील खास क्षण ठरणार आहे तो माधुरीनं गौतमीकडे केलेल्या एका फर्माइशीचा! गप्पांदरम्यान माधुरी तिला ‘पाटलांचा बैलगाडा’ या गाण्याची हुकस्टेप करून दाखवण्यास सांगणार आहे. गौतमीही क्षणाचाही विलंब न लावता हॉटसीटवर बसल्या-बसल्याच आपल्या खास अंदाजात ठेका धरणार आहे. तिची हुकस्टेप पाहून माधुरी टाळ्या वाजवत दाद देणार असून, दोघींमधील हा उत्स्फूर्त संवाद मैफलीची रंगत आणखी वाढवणार आहे.

गौतमीच्या या नृत्याची झलक सोशल मीडियावरही लक्ष वेधून घेत आहे. माधुरीची फर्माइश आणि गौतमीचा ठेका यामुळे प्रश्नोत्तरांच्या खेळाला नृत्याचा तडकाही मिळणार आहे. आता गौतमी आणि शिव माधुरीच्या प्रश्नांना कशी उत्तरं देणार आणि गप्पांमधून आणखी कोणते किस्से उलगडणार, हे पाहणं रंजक ठरेल.

पाहा ‘कोण होणार करोडपती’, सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता, सोनी मराठी आणि Sony LIV वर!

गश्मीर महाजनी, उमेश परिचारक यांना पुरस्कार

याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) वर्धापन दिन सोहळा ; सिटी कार्पोरेशन लि.चे अनिरुद्ध देशपांडे यांची उपस्थिती

■ पुणे (दै. संध्या)

शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) च्या १९ व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यांतर्गत वितरित होणारे सृजन आर्ट गॅलरी पुरस्कृत सृजन युवा कलाकार पुरस्कार व स्व. चंद्रकांत जोशी स्मृतिप्रित्यर्थ युवा उद्योजक पुरस्कार अनुक्रमे लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी आणि युटोपियन शुगर्स लि.चे संचालक उमेश परिचारक यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष विश्राम कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला संस्थेचे कार्याध्यक्ष अध्यक्ष विश्राम कुलकर्णी, कार्यवाह श्रीकांत जोशी, डॉ. चैतन्य सराफ, विवेक मेढेकर, अजय कुलकर्णी, प्रतिभा संगमनेरकर, अपूर्वा देवगावकर, मंजुषा वैद्य, हर्षल लेले, उपेंद्र केळकर, श्रीकांत जोशी, सचिन पंडित आदी उपस्थित होते.

टिळक स्मारक मंदिर येथे शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५



वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिटी कार्पोरेशन लि.चे अनिरुद्ध देशपांडे तसेच राज्यसभेच्या खासदार व संस्थेच्या युवा महिला अध्यक्ष डॉ. मेधा कुलकर्णी या उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यापूर्वी सृजन युवा कलाकार पुरस्कार स्वप्नील जोशी, मनोज जोशी, बेला शेंडे, संदीप खरे, संकर्षण क-हाडे, मुक्ता बर्वे, प्रसाद ओक आदींना देण्यात आला आहे.

पुरस्कार वितरण सोहळा, वर्धापन दिन कार्यक्रमासह ब्राह्मण उद्योजकांचे एकत्रीकरण हा देखील कार्यक्रमाचा उद्देश आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यासोबतच दोन्ही पुरस्कारार्थींच्या यशस्वी प्रवासाबद्दलची प्रकट मुलाखत ऐकण्याची संधी देखील उपस्थितांना मिळणार आहे. सोहळ्याचे आयोजन संस्थेच्या युवा कार्यकारिणीने केले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ ही संस्था १९४० साली स्थापन करण्यात आली. युवा हा उपक्रम २००४ साली स्व. चंद्रकांत जोशी यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर येथील अधिवेशनात सुरु करण्यात आला होता.

आयुर्वेदिक मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

पती-पत्नीला अटक; महिलांची केली सुटका

■ पुणे (दै. संध्या)

वडगाव बुद्रुक परिसरातील एका निवासी इमारतीत 'सोहम आयुर्वेदिक उपचार केंद्र' या मसाज पार्लरवर नऱ्हे पोलिसांनी छापा टाकून पीडित महिलांची सुटका केली. तसेच, मसाज पार्लर चालवणाऱ्या पती-पत्नीला अटक केली आहे. पुणे-बंगळूर महामार्गावरील नवले पुलाजवळ मंगळवारी (ता. २७) रात्री पावणेनऊच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. महादेवी विकास चौगुले (वय ४२) आणि तिचा पती विकास शंकर चौगुले (वय ५०, दोघे रा. शिवाजीनगर गावठाण) अशी अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस हवालदार स्वप्नील सूर्यवंशी यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव बुद्रूक येथील एका इमारतीमधील सदनिकेत 'सोहम आयुर्वेदिक उपचार केंद्र' सुरू होते. या केंद्रात मसाज पार्लरच्या आडोशाने वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी काल रात्री तेथे बनावट ग्राहक पाठवून छापा टाकला. आरोपी पती-पत्नीने पीडित महिलांना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त केले. निवासी भागात अशा प्रकारे बेकायदेशीर कृत्य करून त्यातून मिळणाऱ्या पैशांवर हे आरोपी स्वतःची उपजीविका भागवत होते. या छाप्यानंतर काल रात्री गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.







ट्रूकॉलरने भारतात लॉन्च केले ‘ट्रूकॉलर लाईट’ ॲप

■ पुणे (दै. संध्या)

डिजिटल युगात सुरक्षित संवादासाठी जगातील कोट्यवधी युजर्सचा विश्वास असलेल्या 'ट्रूकॉलर'ने आज भारतात आपल्या विशेष नवीन 'ट्रूकॉलर लाईट' ॲपच्या लाँचिंगची घोषणा केली आहे. कमी स्टोरेज, मर्यादित मेमरी आणि प्रोसेसिंग पॉवर असलेल्या अँड्रॉइड स्मार्टफोन्ससाठी हे ॲप विशेष रूपाने तयार करण्यात आले आहे. अवघ्या १० एमबी आकाराचे हे ॲप क्षणात इन्स्टॉल होते, अत्यंत वेगाने उघडते आणि ४ जीबी पर्यंत रॅम असलेल्या मूलभूत अँड्रॉइड स्मार्टफोन्सवरही अत्यंत सहजतेने चालते. मोबाईलमध्ये स्टोरेज स्पेस कमी असली तरीही युजर्सना नको असलेले स्पॅम आणि फ्रॉड कॉल्स ओळखण्यासह ते ब्लॉक करण्याची मुख्य ट्रूकॉलर ॲपसारखीच भक्कम सुरक्षा आता या लाईट व्हर्जनद्वारे मिळणार आहे. भारतातील सर्वात व्यस्त सणासुदीच्या आणि खरेदीच्या काळात हे ॲप लाँच करण्यात आले आहे. या काळात बनावट डिलिव्हरी कॉल्स, आकर्षक वाटणाऱ्या फेक ऑफर्स आणि केवायसी फसवणुकीचे सायबर स्कॅम कॉल्स अचानक वाढतात. कोट्यवधी नागरिकांसाठी त्यांचा स्मार्टफोन हा डिजिटल पेमेंट, डिलिव्हरी अलर्ट्स आणि कुटुंबाशी संपर्कात राहण्याचे मुख्य माध्यम आहे; मात्र सणांच्या दिवसांत फोटो, व्हिडिओ आणि मेसेज फॉरवर्डसमुळे फोनमधील मेमरी स्पेस लगेच भरून जाते. युजर्सची हीच अडचण लक्षात घेऊन ट्रूकॉलरने हे मूळ अँड्रॉइड ॲप विकसित केले आहे. हे मुख्य ॲपची केवळ छोटी किंवा कट-डाउन आवृत्ती नसून, कमी मेमरी असलेल्या फोन्ससाठी अगदी मुळापासून तयार केलेले स्वतंत्र ॲप आहे. हे ॲप त्याच मुख्य ट्रूकॉलर डेटाबेस आणि डिटेक्शन सिस्टमवर आधारित असल्याने सायबर धोक्यांपासून पूर्ण रक्षण करते.

थोडक्यात पण महत्वाचे



वडगाव आनंद येथे ऊसतोड सुरू असताना बिबट्याची तीन पिल्ले आढळली

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील पांढरमळा परिसरात ऊसतोड सुरू असताना उसाच्या शेतात बिबट्याची सुमारे १० ते १५ दिवसांची तीन पिल्ले आढळून आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पिल्लांना पाहण्यासाठी ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली होती. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पिल्लांच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली असून, मादी बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले आहे. पांढरमळा परिसरातील अजित गोपाळ वाळुंज यांच्या शेतात ऊसतोड सुरू होती. यावेळी ऊसतोड कामगारांना उसाच्या शेतात बिबट्याची तीन लहान पिल्ले दिसून आली. याची माहिती शेतमालक अजित वाळुंज यांनी गावचे माजी उपसरपंच गणेश भुजबळ यांना दिली. त्यानंतर भुजबळ यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना घटनास्थळी बोलावले. पिल्ले आढळून आल्यानंतर संबंधित शेतातील ऊसतोड तातडीने थांबवण्यात आली. पिल्ले अतिशय लहान असल्याने त्यांची मादी बिबट्या आसपासच असण्याची शक्यता वनविभागाने व्यक्त केली. तसेच पिल्लांच्या मातेचा आवाज ऐकू येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे परिसरात सतर्कता बाळगण्यात आली आहे. मादी बिबट्या पिल्लांच्या शोधात पुन्हा या ठिकाणी येण्याची शक्यता लक्षात घेऊन परिसर सुरक्षित करण्यात आला आहे. तसेच मादी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाचे अधिकारी अनिल सोनवणे आणि ज्ञानेश्वर साळुंखे यांनी दिली. दरम्यान, परिसरात बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने अधिक पिंजरे लावावेत, अशी मागणी उपसरपंच संतोष पादीर, निलेश वाळुंज,गणेश भुजबळ,शाम वाळुंज आणि निमेश वाळुंज यांनी केली आहे.

करडे येथे ट्रान्सफॉर्मर फोडून १ लाख ५६ हजार रुपयांच्या तांब्याच्या तारांची चोरी

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर तालुक्यातील करडे येथे स्टेरिऑन कंपनीच्या शेजारील शेड क्रमांक १३ च्या दक्षिणेकडील मोकळ्या जागेत बसविण्यात आलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचे झाकण उघडून त्यातील सुमारे ५२० किलो वजनाच्या तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली. चोरीस गेलेल्या तारांची किंमत अंदाजे १ लाख ५६ हजार रुपये असून, याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजल्यापासून २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. चोरट्यांनी ६३० केव्हीए क्षमतेच्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचे झाकण उघडून आतील तांब्याच्या तारा चोरून नेल्या. याप्रकरणी नानासाहेब हरिभाऊ सोनवणे (वय ५०, व्यवसाय सुपरवायझर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २७ ऑक्टोबर रोजी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९८१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३२४(४) प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या चोरीप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत. ट्रान्सफॉर्मर मधील मोठ्या प्रमाणावरील तांब्याच्या तारांची चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.पुढील तपास सुरू आहे.

पुणे जिल्ह्यातील प्रशासनाच्या भूमिकेवर नामदेव भोसले यांची नाराजी



कोरेगावमुळ : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील गरीब आणि वंचित कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचे आश्वासन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. तसेच राज्यातील निवासी आदिवासी कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी घरपट्टी देणे ते रहात आहेत त्या ठिकाणी घरकुल देऊन स्थिर करणे जर का आदिवासी कुटुंबांना न्याय न देणाऱ्या ग्रामपंचायती, ग्रामसेवक व तलाठ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश महसुल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यानी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, पुणे जिल्ह्यात या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसुन सदर पुणे जिल्हा परीवार कार्यालय व आदिवासी प्रकल्प घोडेगाव यांनी महसुल मंत्री याच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहेत असल्याचा आरोप आदिवासी समाजसेवक व साहित्यिक नामदेव भोसले यांनी केला आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे जिल्हा परिषद, आदिवासी प्रकल्प घोडेगाव कार्यालयाकडून आणि वन विभागाकडून आदिवासी पारधी, फासेपारधी व भिल्ल समाजातील गरीब कुटुंबांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची खंत नामदेव भोसले यांनी व्यक्त केली. शासकीय कार्यालयांमध्ये आपल्या समस्या मांडण्यासाठी येणाऱ्या पीडित नागरिकांना समजून घेण्याऐवजी कार्यालयाबाहेर थांबवले जाते. काही ठिकाणी त्यांना भेदभावपूर्ण वागणूक मिळत असल्याचा आरोपही त्यांनी केला. आजही अनेक आदिवासी कुटुंबे घरकुल, घरपट्टी आणि मूलभूत शासकीय सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, यंदाची दिवाळीही अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शासन गरीबांच्या मदतीसाठी आश्वासने देत असताना स्थानिक प्रशासनाने मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे नामदेव भोसले म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पुण्याचे पालकमंत्री आणि विभागीय आयुक्त यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी. महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडताना आदिवासीसेवक नामदेव भोसले, सचिन भोसले, बाबा भोसले, विजय काळे, संतोष भोसले, अक्षय भोसले उपस्थित होते.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

ई-निविदा सुचना

सासवड विभागातील पुढील कामांसाठी नोंदणीकृत अनुभवी पुरवठादार तसेच ठेकेदार यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम
टि-१६/२०२६-२७	फ्युज वायर पुरविणे	रु. ५.०० लाख

कोरे निविदा संच महावितरणचे संकेतस्थळावर दि.२९.१०.२०२६ ते दि.०३.११.२०२६ पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहिल. सदर निविदा शुल्क ऑनलाईन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकाराने स्वत:कडे राखून ठेवला आहे. अधिक माहितीसाठी व वेळोवेळी होणाऱ्या बदलांसाठी कंपनीचे संकेतस्थळ नियमीत पहावे. https://etender.mahadiscom.in/eatApp/

(पीआरओ/बीएमटीझेड:१३९/२०२६-२७)

कार्यकारी अभियंता, महावितरण, सासवड विभाग

मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमकीचे गुन्हे दाखल

शिंदेवाडी व तरडोबाचीवाडीतील घटना; कौटुंबिक आणि सामाईक विहिरीच्या वादातून मारहाणीचे प्रकार

■ कवठे येमाई (दै. संध्या)



शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शिंदेवाडी आणि तरडोबाचीवाडी येथे मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या तीन स्वतंत्र घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणी शिरूर पोलिसांनी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल केले असून, संबंधित प्रकरणांचा तपास सुरू आहे.

१. सामाईक विहिरी वरील पाण्याची मोटार वरून वाद

मलठण जवळील शिंदेवाडी येथे २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठच्या सुमारास सामाईक विहिरीवरील पाण्याची मोटार बंद केल्याच्या कारणावरून वाद झाला. याप्रकरणी सविता दशरथ कोळपे (वय ४०, रा. शिंदेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, मोटार बंद केल्याबाबत विचारणा करण्यासाठी गेल्यानंतर वैशाली भिवा शिंदे, भानुदास भिवा शिंदे आणि भिवा ठकाजी शिंदे यांनी शिवीगाळ व दमदाटी केली. यावेळी वैशाली शिंदे हिने फिर्यादीला खाली पाडले, तर भानुदास शिंदे याने दगडाने हाताला, डोक्याला व पाठीवर मारहाण केली. भिवा शिंदे यानेही लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९८५/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहायक फौजदार चव्हाण करीत आहेत.

२. तरडोबाचीवाडीत पत्नी व माहेरच्या नातेवाइकांना मारहाण

तरडोबाचीवाडी येथे २७ ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास मारहाणीची दुसरी घटना घडली. सारिका विनोद आबुज (वय ४३, रा. यादववाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यांनी पती विनोद नानाभाऊ आबुज यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, विनोद आबुज हे दारूच्या नशेत हातात काठी घेऊन आले. त्यांनी पत्नी, तिचे वडील पांडुरंग गोरे आणि भाऊ संदीप गोरे यांना शिवीगाळ व दमदाटी करून काठीने डोक्यात, छातीवर व पाठीवर मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९८४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला असून, तपास पोलीस हवालदार मोरे करीत आहेत.

३. जुन्या तक्रारीच्या कारणावरून कुऱ्हाडीच्या उलट्या बाजूने मारहाण

शिंदेवाडी, मलठण येथे २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठच्या सुमारास जुन्या तक्रारीच्या कारणावरून वाद झाल्याची तिसरी घटना घडली. भिवा ठकाराम शिंदे (वय ४२, रा. शिंदेवाडी, मलठण) यांनी दशरथ तुकाराम कोळपे आणि सविता दशरथ कोळपे यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, फिर्यादी घरासमोरील मोकळ्या जागेत दात घासत उभे असताना आरोपींनी त्यांच्या मुलाने यापूर्वी टाकळी हाजी पोलीस चौकीत तक्रार का दिली, या कारणावरून वाद घातला. यावेळी दशरथ कोळपे याने हातातील लोखंडी कुऱ्हाडीच्या उलट्या बाजूने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले. भांडण सोडविण्यासाठी मध्ये आलेल्या फिर्यादीच्या पत्नी वैशाली शिंदे यांनाही सविता कोळपे हिने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दोघांनी शिवीगाळ व दमदाटी केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९८२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस हवालदार वायाळ करीत आहेत. शिरूर पोलिसांकडून तिन्ही प्रकरणांचा तपास सुरू असून, पुढील तपासात घटनांबाबत अधिक माहिती स्पष्ट होणार आहे.

पुण्यात महात्मा फुले स्मारकासाठी २३० कोटींचा प्रस्ताव मान्य

■ मुंबई (दै. संध्या)

मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीच्या बैठकीत निर्णय

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त पुण्यातील फुलेवाडा परिसराच्या संपूर्ण विकासासाठी २३० कोटी रुपयांच्या विकास प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनांनुसार या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत फुलेवाडा परिसराचे सुशोभीकरण करण्यासोबतच आवश्यक जमीन संपादन करून संपूर्ण परिसराचा कायापालट केला जाणार असल्याची माहिती मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्रालयात समितीची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी चंद्रशेखर बावनकुळे हे होते. बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड तसेच इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महात्मा फुले यांच्या जयंती वर्षानिमित्त बहुजन आणि इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणासाठी अनेक धोरणात्मक निर्णय जाहीर करण्यात आले. ऐतिहासिक भिडेवाडा येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेचे स्मारक उभारणीचे काम येत्या तीन आठवड्यांत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले. यासोबतच महसूल, पाणीपुरवठा आणि वनविभागासह दुष्काळ निवारणावर काम करणाऱ्या ११ प्रमुख विभागांच्या सर्व कल्याणकारी उपाययोजना म. ज्योतिबा फुले यांच्या नावाने राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतचे स्वतंत्र शासन निर्णय लवकरच निर्गमित केले जाणार आहेत.

राज्यभरातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती देण्यासाठी ३६ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ५०० क्षमतेची ओबीसी वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. यासाठी महसूल विभागामार्फत अवघ्या एक रुपया नाममात्र दराने जमीन उपलब्ध करून दिली जाणार असून, एमएसआयडीसीने या वसतिगृहांचे अधिकृत डिझाइन तयार केले आहे. तसेच भटक्या व विमुक्त जातींना विकासनिधीचा थेट लाभ मिळावा यासाठी ओबीसी बजेटमधून व्हीजेएनटीचे बजेट वेगळे करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. येत्या डिसेंबर महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात वित्त विभागाकडे या स्वतंत्र बजेट हेडसाठी तरतूद मागितली जाणार आहे.

मराठा समाजासाठी स्थापन केलेल्या शिंदे समितीच्या धर्तीवर व्हीजेएनटी समाजाचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यास समिती गठित केली जाणार आहे.

संग्राम दुर्ग किल्ल्यात उत्खननास प्रारंभ

■ चाकण (दै. संध्या)



शासनाच्या पुरातत्व विभाग, पुणे यांच्या वतीने चाकण येथील ऐतिहासिक किल्ले संग्राम दुर्ग येथे पुरातत्व उत्खननास प्रारंभ करण्यात आला आहे. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यांनी स्वराज्यासाठी केलेल्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या या किल्ल्याचे ऐतिहासिक अवशेष प्रकाशात यावेत, या उद्देशाने हे उत्खनन हाती घेण्यात आले आहे. या कामाचे भूमिपूजन किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा पतसंस्थेचे उपाध्यक्ष सत्यवान तांबे, शैलेश कड, ऋषिकेश बुचुडे, योगेश साखरे, राजू दीक्षित, राहुल वाडेकर, किशोर परदेशी, अनंत देशमुख, ॲड.किशोर झिंजुरके आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, इतिहास प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तोडणीला आलेला चार एकर ऊस शॉर्टसर्किटमुळे जळून खाक



■ नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथे विद्युत वाहक तारांमधील घर्षणामुळे लागलेल्या आगीत शेतकऱ्याचा तोडणीला आलेला चार एकर ऊस जळून खाक झाला. या दुर्घटनेत ऊस पिकासह ठिबक सिंचन संच आणि पाईप जळाल्याने सुमारे १४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अंबादास उर्फ लक्ष्मण दत्तात्रय वाजगे आणि निर्मला लक्ष्मण वाजगे या शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मंगळवारी सकाळी नारायणगाव-येडगाव शिवेवरील डिंभा डावा कालवा परिसरात जोरदार वारा वाहत होता. यावेळी वाजगे यांच्या शेतातून गेलेल्या विद्युत वाहक तारांमध्ये घर्षण होऊन ठिणग्या पडल्या. त्यामुळे उसाच्या शेताला आग लागली. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण चार एकर क्षेत्रातील ऊस जळून गेला. आगीची माहिती मिळताच स्थानिक शेतकरी आणि शेतमजुरांनी पाणी टाकून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. नाथ खैरे, राजू नेहरकर, हरिदास केदार, व्यंकटेश उर्फ अक्षय वाजगे, देविदास केदार, किरण वाजगे, लहानु केदार, राजू कोऱ्हाळे यांच्यासह केदार कुटुंबीयांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, जोरदार वाऱ्यामुळे त्यांचे प्रयत्न असफल ठरले. या घटनेची माहिती शेतकरी नाथ खैरे यांनी नारायणगावचे उपसरपंच योगेश पाटे यांना दिली. त्यांनी ग्रामपंचायतीचा अग्निशमन बंब पाठवण्याचा प्रयत्न केला; मात्र तो वेळेत घटनास्थळी पोहोचू शकला नाही. उपसरपंच पाटे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. घटनेनंतर तलाठी, कृषी सहाय्यक आणि ग्रामविकास अधिकारी यांनी पंचनामा केला. वीज वितरण विभागाचे अभियंता चौधरी, वायकर, ढाले वायरमन तसेच अन्य वीज कर्मचाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी स्थानिक शेतकरी तुकाराम कोऱ्हाळे, सतीश नेहरकर, संदीप वारुळे, अक्षय कसाबे, पंकज अडसरे, गौतम खैरे तसेच भीमाशंकर साखर कारखान्याचे प्रतिनिधी आणि अन्य शेतकरी उपस्थित होते. तोडणीला आलेले पीक आगीत नष्ट झाल्याने वाजगे कुटुंबीयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, या नुकसानीमुळे शेतकरी संकटात सापडले आहेत.

जाहीर नोटीस

जुन्नर येथील मे. ए. एम. हुसेन सो. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, जुन्नर यांचे कोर्टात

रे.मु नं. १४५/२०२६
नि. ०७

मंदाकिन प्रभाकर वाळुंज
वि. - वादी
महाराष्ट्र शासन तर्फे मा. जिल्हाधिकारी साहेब व इतर - प्रतिवादी

याद्वारे जाहीर करण्यात येते की, वादी यांनी त्यांचे पती प्रभाकर दगडु वाळुंज हे दि. १७/०८/१९९२ पासुन गाव रा. सातारा, ता. जि. सातारा येथुन बेपत्ता झालेले असल्याने दि. १७/०८/१९९२ पासुन प्रभाकर दगडु वाळुंज यांना मृत घोषित करण्याचे ठरावासाठी वादी यांनी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू दाव्यासबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी नेमलेली तारीख ०७/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. किंवा नोटीस प्रसिध्दीपासुन १ महिन्याचे आत स्वतः अगर वकीलांमार्फत लेखी हरकत न्यायालयात नोंदवावी. कोणतीही हरकत न आल्यास सदरहु वादी यांचे म्हणण्याप्रमाणे मृत घोषित करण्याबाबत योग्य तो आदेश देण्यात येतील.

आज दि. २२/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे सही शिक्यानिशी दिले.

शिक्का

हुकूमावरून
सही/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व. स्तर जुन्नर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विषेशतः शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे आसपासचे तसेच जुन्नर तालुक्यातील सर्व लोकांना आमचे अशिल सूर्यपुत्र डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. बंडू सदाशिव कर्पे व इतर दोन रा. कल्याण पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. यांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहितीवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

नगरपरिषद शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सि.स.नं. २५७, वर्णन-१९७५ चौ, मी. मिळकत ही श्री. मारूती बबन शिंदे, सुभाष शंकर शिंदे, इंदूमती गोविंद शिंदे, नितीन गोविंद शिंदे, श्री. शेखर गोविंद शिंदे, माधूरी दत्तात्रय म्हसकर, सुनिल सदाशिव शिंदे, गणेश सदाशिव शिंदे, रमेश सदाशिव शिंदे, सुमन गोरख गावडे, सचिन दत्तात्रय शिंदे, सौलता गौतम चव्हाण, सौ. उषा लक्ष्मण डूंबरे, शशिकला दशरथ घोलप, निता नितीन घोलप यांचे सामाईक मालकी वहिवाटीची असून त्यांचेच नाव सिटी सर्व्हेच्या उता-यावर दाखल आहे. आमचे आशिलांना सध्याचे विद्यमान मालकांनी वर वर्णन केलेल्या संपूर्ण क्षेत्र विकसन करण्यासाठी घेतली असून ते तेथे नवीन गृहप्रकल्प बांधण्यास सुरूवात करणार आहेत सदर मिळकती संदर्भात इतर कोणाचाही हित हक्कसंबंध नसलेबाबत तसेच सदर जमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत व कोणत्याही संपादनाचा भाग नसल्याबाबत आमचे आशिलांस त्यांनी खात्री दिली आहे. तरी सुध्दा या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, वरील जमिनी संदर्भात कोणाचीही मालकी वहिवाट, बक्षिसपत्र, लीन, गहाण दान, लीज, भाडेपटटा, खरेदी विक्री, साठेखत वगैरे मार्गाने या अगोदर व्यवहार झाले असल्यास अथवा मालकी हक्क संदर्भातील कागदपत्रे तयार असल्यास त्या कागदपत्रासहित ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी अशी असून सदर मिळकतीशी इतर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व तो असल्यास जाणीवपूर्व क सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

दि. २५/१०/२०२६
येणेप्रमाणे जाहीर नोटीस

ॲड. रोहिणी लक्ष्मण गाडेकर
(बी.ए.एल. एल. बी.डी. एल. एल.)
रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.
मोबाईल नं. ९८६०४८३०३१.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक ३६ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/ इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून रू. १००.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीचे कामासाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध/ऑनलाईन विक्री कालावधी आणि निविदा सादर करावयाचा कालावधी	:-	दिनांक : २१/१०/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक : १३/११/२०२६ सांयकाळी १८.०० वाजेपर्यंत.
निविदा पुर्व चर्चा बैठक	:-	दि. ०५/११/२०२६ रोजी वेळ सकाळी १२.०० वाजता. मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये.
ऑनलाईन ई निविदा उघडणेचा कालावधी	:-	दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास)

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(प्रशांत शंकर खैरमोडे)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

आरओसी-२०२६-२७/क्र-५/८३४५२

जय हिंद स्कूल विरोधातील तक्रारी धूळ खात

चौकशी समिती दीड वर्षापासून कागदावरच : प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव ॲड. उमेश खंदारे यांचा आरोप

> ॲड. उमेश खंदारे म्हणाले, “शाळेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असताना तक्रारी, नोटिसा आणि चौकशी समिती नियुक्त करूनही प्रत्यक्ष तपासणी न होणे ही संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह आहे. ८ जानेवारी २०२५ रोजी समिती नेमूनही बैठक व पाहणी झाली नसेल, तर या प्रकरणाची वरिष्ठांनी तातडीने गंभीर दखल घेऊन शाळेसोबत संबंधित अधिकारी व समितीमधील सदस्य यांच्यावरही नियमानुसार कारवाई केली पाहिजे.”

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी येथील सिंघू एज्युकेशन ट्रस्ट संचलित जय हिंद प्राथमिक-माध्यमिक विद्यालयाबाबत पालक व विद्यार्थ्यांकडून सातत्याने करण्यात आलेल्या तक्रारींनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने शाळेला वेळोवेळी नोटिसा बजावून चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले. मात्र, शाळा व्यवस्थापनाकडून चौकशीसाठी उपस्थिती नोंदविण्यात आली नसल्याचा दावा असून, त्यानंतर शाळेची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी महापालिकेने चौकशी समिती नियुक्त केली. विशेष म्हणजे, दि. ८ जानेवारी २०२५ रोजी समिती नियुक्त होऊन दीड वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटत आला असतानाही समितीची एकही बैठक झालेली नसल्याचा आणि शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करण्यात आलेली नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव ॲड. उमेश खंदारे यांनी केला आहे. ॲड. खंदारे यांनी २०२३ पासून जय हिंद स्कूलसंदर्भात महापालिका शिक्षण विभागाकडे विविध तक्रारी दाखल केल्या आहेत. यामध्ये इयत्ता चौथी उत्तीर्ण विद्यार्थ्याला इयत्ता पाचवीमध्ये प्रवेश नाकारल्याबाबतची तक्रार, इयत्ता नववीतील ५९ विद्यार्थ्यांना नापास करून पुढील प्रवेश न देणे तसेच दाखले काढून घेण्यासाठी आणि १७ नंबरचा फॉर्म भरून दहावीची परीक्षा देण्यासाठी पालकांवर दबाव टाकल्याबाबतची तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर प्रवेशाच्या वेळी ‘रिफंडेबल डिपॉझिट (इंटरेस्ट फ्री)’च्या नावाखाली प्रत्येक विद्यार्थ्याकडून १० हजार रुपये घेतले जात असल्याबाबतही तक्रार करण्यात आली. या सर्व तक्रारींची चौकशी करून नियमानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. या तक्रारींच्या अनुषंगाने महापालिका शिक्षण विभागाने शाळेला वेळोवेळी नोटिसा बजावून चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले. मात्र, संबंधित नोटिसांना प्रतिसाद देऊन शाळा व्यवस्थापन चौकशीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहिले नसल्याचे ॲड. खंदारे यांचे म्हणणे आहे. शाळा प्रशासनाकडून चौकशीसाठी अपेक्षित सहकार्य होत नसेल, तर शिक्षण विभागाने आपल्या अधिकारांचा वापर करून नियमानुसार पुढील कार्यवाही करणे अपेक्षित असताना, त्याऐवजी प्रकरण दीर्घकाळ प्रलंबित ठेवून हितसंबंध जोपासले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. शाळेच्या तक्रारींची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी शिक्षण विभाग (प्राथमिक), पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी यांच्या आदेशाने दि. ८ जानेवारी २०२५ रोजी क्र. शिक्षण/खाप्राशा/३/कावि/२४/२०२५ अन्वये प्रशासन अधिकारी संगीता बागर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने शाळेची तपासणी करून स्वयंस्पष्ट अहवाल कार्यालयास सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले होते.

मात्र, समिती नियुक्त होऊन दीड वर्षा पेक्षा जास्त कालावधी उलटत असतानाही प्रत्यक्ष बैठक आणि शाळेची पाहणी झाली नसल्याचा आरोप ॲड. खंदारे यांनी केला आहे. त्यामुळे तक्रारींची चौकशी करण्यासाठी नेमलेली समिती प्रत्यक्ष काम करण्याऐवजी केवळ कागदोपत्रीच राहिली आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

दरम्यान, १० हजार रुपयांच्या कथित ‘रिफंडेबल डिपॉझिट’सह विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील तक्रारी, नववीतील विद्यार्थ्यांच्या कथित नापास प्रकरण आणि पालकांवर टाकण्यात आल्याचा आरोप असलेल्या दबावाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शाळेला बजावण्यात आलेल्या नोटिसांनंतर कोणती कार्यवाही करण्यात आली, ८ जानेवारी २०२५ रोजी नियुक्त समितीने आतापर्यंत काय काम केले, समितीच्या बैठका का झाल्या नाहीत आणि शाळेची प्रत्यक्ष पाहणी का करण्यात आली नाही, याचा लेखी खुलासा शिक्षण विभागाने करावा, अशी मागणी ॲड. खंदारे यांनी केली आहे.

“पालक आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांना केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष कार्यवाहीचा परिणाम दिसला पाहिजे,” अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

थोडक्यात पण महत्वाचे



ऐश्वर्या बाबर यांच्याकडून दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक लाखांची मदत..!

■ वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धनादेश सुपूर्द

पिंपरी : दैनिक संध्या

वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून सामाजिक उत्तरदायित्व जपण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष ऐश्वर्या बाबर यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. २० ऑक्टोबर रोजी वाढदिवसानिमित्त त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन एक लाख रुपयांचा धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी आमदार अमित गोरखे उपस्थित होते. अल-निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील काही भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, गरजू नागरिकांना मदत व्हावी या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे बाबर यांनी सांगितले. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्याऐवजी समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. ऐश्वर्या बाबर यांचे पती अमित बाबर यांच्या कुटुंबाचा पिंपरी-चिंचवडच्या सार्वजनिक व राजकीय क्षेत्रात प्रदीर्घ वारसा आहे. त्यांचे आई-वडील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्यरत होते, तर त्यांचे चुलते स्व. गजानन बाबर यांनी खासदार आणि आमदार म्हणून काम केले आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी केलेल्या या आर्थिक योगदानाची शहरात चर्चा होण्याची शक्यता आहे.

मोशी डेपोत शहराबाहेरील कचरा आणत नाही; साचलेल्या कचऱ्याचे कारण

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोत झालेल्या दुर्घटनेमुळे शहरभरात जमा करून ठेवलेला कचऱ्यामुळे तसेच, सण उत्सवामुळे कचऱ्याचे वजन वाढले आहे. वजन वाढवून ठेकेदारांचे खिसे भरण्यासाठी शहराबाहेरील कचरा मोशी डेपोत आणला जात नाही, असा दावा महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी केला आहे. शहराचे कचऱ्याचे वजन वाढले; अचानक शहरातील कचऱ्याचे वजन वाढल्यामुळे शंका निर्माण करण्यात येत आहेत. दररोज 1 हजार 500 टन कचरा जमा होत असताना अचानक सहाशे टन कचरा कसा वाढला, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ठेकेदाराला अधिक शुल्क मिळावे, म्हणून शहराबाहेरील आजूबाजूच्या गावातील कचरा गोळा करून वजन वाढण्याचा प्रकार सुरू असल्याचे आरोपही केले जात आहेत. यासंदर्भात विचारले असता अतिरिक्त आयुक्त जंगम बोलत होते. अतिरिक्त आयुक्त जंगम म्हणाले की, मोशी कचरा डेपोत वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार 8 जुलै 2026 ला घडला. तेव्हापासून मोशी डेपोत कचरा वाहतूक करणारे वाहने ये-जा करणे बंद झाल्याने शहरात कचऱ्याची समस्या निर्माण झाली होती. तात्पुरता उपाय म्हणून शहरातील काही भागांत दैनंदिन कचरा जमा करण्यात आला. तसेच, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या निगडी येथील जागेत आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या शंकरवाडी येथील डेपोत कचरा जमा करण्यात आला.

पिंपळे गुरव बसस्थानकावर अपघातानंतरही निष्काळजीपणा कायम

पिंपळे गुरव : दैनिक संध्या

नियंत्रण सुटलेल्या बसने कंट्रोल केबिन आणि शेडला उडवल्याच्या गंभीर घटनेला तब्बल आठ दिवस उलटून गेले, तरी पिंपळे गुरव बसस्थानकावर प्रशासनाचा निष्काळजीपणा कायम आहे. अपघातानंतरचा विटा-सिमेंटचा ढिगारा आणि लटकणारी धोकादायक भिंत तशीच पडून असून, याकडे साफ दुर्लक्ष करणाऱ्या पीएमपी प्रशासनाचे डोळे नेमके कधी उघडणार? असा संतप्त सवाल आता नागरिक व प्रवाशांमधून विचारला जात आहे. अपघाताला आठ दिवस उलटूनही साधा राडारोडा हटवण्याची तसदी न घेणारे पीएमपी प्रशासन नेमके झोपेचे सोंग घेऊन बसले आहे का?, प्रवाशांच्या जीवाशी चाललेला हा खेळ आणि कर्मचाऱ्यांची उन्हात होत असलेली होरपळ प्रशासकीय नाकर्तेपणाचा कळस दाखवणारी आहे. एखादा मोठा अपघात घडून कोणाचा बळी गेल्यावरच या सुस्त अधिकाऱ्यांना जाग येणार आहे का?, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. घटनास्थळी विखुरलेले विटा-सिमेंटचे तुकडे, सिमेंटचे मोठे ब्लॉक आणि अर्धवट पडलेली धोकादायक भिंत यामुळे बसस्थानक परिसरात अपघाताचा धोका कायम असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

लाडू, चकली, करंजी महाग; दरांत २० ते ३० टक्क्यांची वाढ

■ चिंचवड (दै. संध्या)

दिवाळी दोन आठवड्यांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठत फराळाच्या पदार्थांची तयारी सुरू झाली आहे, मात्र यंदा महागाईमुळे फराळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांच्या दरात वाढ झाली आहे. तेल, डाळी, साखर, मसाले, सुकामेवा आणि तुपाच्या दरवाढीचा परिणाम तयार फराळाच्या किमतीवर झाला असून, गतवर्षीच्या तुलनेत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दिवाळी सणासाठी घराघरात फराळ तयार करण्याची परंपरा आहे. घरोघरी विविध पदार्थ बनवण्याची परंपरा आहे, मात्र नोकरी-व्यवसायामुळे वेळेची कमतरता असणाऱ्या कुटुंबाकडून तयार फराळ खरेदी करण्याला पसंती दिली जाते. त्यामुळे दिवाळीच्याकाळात मिठाईची दुकाने आणि फराळ विक्री केंद्रावर ग्राहकांची गर्दी वाढते. दुष्काळी परिस्थितीमुळे कृषी उत्पादने आणि पुरवठा घटल्याने ही तयार फराळांचे दर वाढत आहेत. त्यामुळे यंदा ग्राहकांच्या खिशाला जादा भुर्दंड पडणार आहे.

दरवाढीमुळे दिवाळीचा गोडवा वाढवणाऱ्या तयार लाडू, करंजी, शंकरपाळी, अनारसी, चकली यासारख्या पदार्थांसाठी यंदा ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. कमी पावसामुळे विविध पिकांच्या उत्पादनातील घट आणि तुलनेत कायम असलेल्या मागणीमुळे दिवाळी फराळासाठी लागणाऱ्या बहुतांश वस्तूंच्या दरात गतवर्षाच्या तुलनेत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढलेल्या दरामुळे ग्राहकांचे बजेट कोलमडणार असून, यंदाची दिवाळी अधिक खर्चिक असणार आहे.

आमदार सुनील शेळके यांच्या पाठपुराव्याला यश

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी शासकीय समिती दोन दिवसांत तालुक्यात येणार

■ मावळ (दै. संध्या)



मावळ तालुक्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची दखल घेत आमदार सुनील आण्णा शेळके यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी शासकीय समिती येत्या दोन दिवसांत मावळ तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहे. दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत मंत्रालय स्तरावर झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मावळ तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. समितीच्या पाहणीनंतर सादर होणाऱ्या अहवालाकडे आता तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. मावळ तालुका हा राज्यातील प्रमुख भात उत्पादक क्षेत्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. मुबलक पाऊस, अनुकूल हवामान आणि सुपीक जमीन यामुळे मावळमध्ये भातशेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. येथील इंद्रायणी भाताला राज्यासह देशभरात मोठी मागणी असून, तालुक्यातील हजारो शेतकरी भात पिकावर आपल्या आर्थिक उत्पन्नासाठी अवलंबून आहेत. तालुक्यात दरवर्षी १२ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर भात लागवड केली जाते. त्यामुळे भात पिकाचे नुकसान म्हणजे केवळ शेतीचे नुकसान नसून, ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. यंदा मात्र पावसाने ओढ दिल्याने मावळच्या भातशेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. हंगामात अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे अनेक भागांतील भात पिकांना आवश्यक प्रमाणात पाणी मिळाले नाही. परिणामी, पिके करपणे, रोपांची वाढ खुंटणे आणि उत्पादनात घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी भाताची पिके वाळून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील धरणांमध्ये पाणीसाठा असला तरी तो शेतीपर्यंत आवश्यक वेळी आणि पुरेशा प्रमाणात पोहोचविण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे 3 नोव्हेंबरला उद्घाटन?

■ पिंपरी (दै. संध्या)



माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे येत्या ३ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी मंगळवार (दि. २७) मेट्रो स्थानके व परिसराचा पाहणी दौरा करून तयारीचा आढावा घेतला. या वेळी अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी या उपस्थित होत्या. हिंजवडीतील आयटी पार्कसह पिंपरी-चिंचवड व पुण्यातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने हा मेट्रो प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. मेट्रोच्या उद्घाटनासाठी यापूर्वी काही तारखा चर्चेत होत्या; परंतु वेळोवेळी विविध कारणास्तव मेट्रो सेवा सुरू होऊ शकली नव्हती. मात्र, आता पंतप्रधान व्हर्च्युअल पद्धतीने कार्यक्रमात सहभागी होणार असल्याने नियोजित तारखेलाच उद्घाटन होण्याची शक्यता आहे. उद्घाटनाचा सोहळा बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार असून, या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहणार आहेत. मेट्रोच्या या मार्गावरील १७ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून त्यांना सुरक्षा मंजुरी (CMRS) मिळालेली आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात या स्थानकांवर प्रवासी सेवा सुरू होईल. तर ६ स्टेशनचे काम अद्याप सुरू आहे. विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमुळे लागू असलेली आचारसंहिता संपल्यानंतर या उद्घाटनाचा मार्ग मोकळा होईल. पीएमआरडीए आयुक्तांच्या पाहणी दौऱ्यामुळे उद्घाटनाच्या तयारीला वेग आल्याचे चित्र आहे. पुढील दोन दिवसांत प्रवासी सेवा सुरू होण्याबाबतची अधिकृत घोषणा केली जाईल.

पीएमपी बसला उशीर झाला तरी एका क्लिकवर कळणार!

■ पिंपरी (दै. संध्या)

पीएमपीएमएलच्या बस वेळेवर धावतात की नाही, यावर डिजीटल नोंदीच्या माध्यमातून लक्ष ठेवता येणे शक्य झाले आहे. बसची नियोजित वेळ, प्रत्यक्ष सुटण्याच्या वेळी,फेरी पूर्ण झाल्याची नोंद आणि संबंधित चालक-वाहकांची माहिती एकाच क्लिकवर कळणार आहे. पुणे महानगर परिवहन मंहामंडळाच्या प्रवाशांना आता कोणत्या मार्गावर,कोणत्या आगारातून आणि कोणत्या फेरीला विलंब झाला हे तत्काळ तपासणे शक्य होणार आहे. या व्यवस्थेमुळे बसच्या वेळापत्रकामध्ये अचूकता आणण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. पीएमपीएमएलमध्ये तिकीट यंत्रणेतील नोंदी आणि बस संचालनाशी संबंधित माहिती एकत्र आणण्यासाठी दोन डिजीटल प्रणाली जोडण्यात आल्या आहेत. गेल्या महिनाभरापासून या व्यवस्थेचा वापर सुरु करण्यात आला. बस क्रमांक, मार्ग क्रमांक, संबंधित आगार, वाहकाची ओळख तसेच फेरी सुरु झाल्याची आणि पुर्ण झाल्याची नोंद उपलब्ध होते. नियोजित आणि प्रत्यक्ष वेळेची तुलना करुन विलंब नेमका कुठे झाला, हे तपासता येणार आहे.

किती फेऱ्यांना उशिरा झाला याची माहिती मिळते. विलंब झालेल्या फेरीची नोंद उघडल्यावर संबंधित तपशील समोर येतो. त्यानुसार आगार व्यवस्थापकांना खुलासा मागविता येतो. त्यामुळे चालक-वाहकांच्या कामकाजावर देखरेख ठेवून जवाबदारी निश्चित करणे शक्य होते. डिजीटल नोंदीमुळे विलबांची माहिती तात्काळ मिळत असली, तरी बस वेळेवर धावण्यास अनेक अडथळे आहेत. सकाळच्या सत्रात वेळपालनाचे प्रमाण ९७ ते ९८ टक्क्यापर्यंत असते.

श्रद्धा, भक्ती आणि जिद्दीचा अनोखा संगम; दाम्पत्याची १२ ज्योतिर्लिंग यात्रा पूर्ण!

तब्बल ११ हजार किलोमीटरचा प्रवास दुचाकीवरून; नथूमामा आणि शांताबाई शितोळे यांच्या धार्मिक यात्रेचे भोसरीत उत्साहात स्वागत

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)



मनात दृढ श्रद्धा, भगवान शंकरावरील नितांत भक्ती आणि प्रवासातील आव्हानांना सामोरे जाण्याची जिद्द असेल, तर वय किंवा प्रवासातील अडचणीही भक्तीच्या आड येऊ शकत नाहीत, याचा प्रेरणादायी प्रत्यय भोसरीतील एका दाम्पत्याने घडवून दिला आहे. भोसरी गावचे रहिवासी नथूमामा सखाजी शितोळे आणि शांताबाई नथू शितोळे यांनी दुचाकीवरून तब्बल ११ हजार किलोमीटरचा प्रवास करीत देशभरातील बारा ज्योतिर्लिंगांची धार्मिक यात्रा पूर्ण केली. या अनोख्या भक्तिमय प्रवासानंतर भोसरीत परतलेल्या शितोळे दाम्पत्याचे भोसरी युवा प्रतिष्ठान, समस्त भोसरी ग्रामस्थांच्या वतीने सहर्ष स्वागत करण्यात आले. भारतीय संस्कृतीत बारा ज्योतिर्लिंगांच्या दर्शनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. देशाच्या विविध राज्यांमध्ये असलेल्या या पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याची अनेक भाविकांची इच्छा असते. मात्र, लांबचा प्रवास, बदलते हवामान, रस्त्यांची परिस्थिती आणि प्रवासातील शारीरिक कष्ट यामुळे ही यात्रा पूर्ण करणे आव्हानात्मक ठरते. अशा परिस्थितीत शितोळे दाम्पत्याने चारचाकी वाहन किंवा आरामदायी प्रवासाचा पर्याय न निवडता दुचाकीवरून ही यात्रा पूर्ण केल्याने त्यांच्या भक्तीचे आणि जिद्दीचे विशेष कौतुक होत आहे. गुजरातमधील सोमनाथ आणि नागेश्वर, आंध्र प्रदेशातील मल्लिकार्जुन, मध्य प्रदेशातील महाकालेश्वर आणि ओंकारेश्वर, उत्तराखंडमधील केदारनाथ, महाराष्ट्रातील भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर आणि घृष्णेश्वर, उत्तर प्रदेशातील काशी विश्वनाथ, झारखंडमधील वैद्यनाथ आणि तामिळनाडूमधील रामेश्वरम या ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

देशाच्या विविध भागांत विखुरलेल्या या तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाचा संकल्प शितोळे दाम्पत्याने पूर्ण केला. या यात्रेच्या माध्यमातून त्यांनी केवळ धार्मिक श्रद्धाच व्यक्त केली नाही, तर दृढ इच्छाशक्ती आणि परस्परांच्या साथीने मोठे उद्दिष्ट साध्य करता येते, हेदेखील दाखवून दिले.

लांब पल्ल्याचा प्रवास करताना प्रवाशांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः दुचाकीवरून प्रवास करताना ऊन, वारा, पाऊस, थंडी, डोंगराळ भागातील रस्ते आणि सततचा प्रवास यांसारखी आव्हाने असतात. त्यातच देशाच्या विविध भागांतील भौगोलिक परिस्थिती, भाषा, खाद्यसंस्कृती आणि हवामानातील बदल यांच्याशी जुळवून घेणेही आवश्यक असते. विशेष म्हणजे, पती-पत्नीने एकत्रितपणे केलेला हा प्रवास कौटुंबिक सहजीवनातील परस्परविश्वास आणि सहकार्याचेही उदाहरण ठरला आहे. भोसरी परिसराला ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा वारसा लाभला आहे. विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांतून भोसरीतील नागरिक आपली वेगळी ओळख निर्माण करीत असतात. याच परंपरेत शितोळे दाम्पत्याच्या बारा ज्योतिर्लिंग यात्रेने आणखी एक प्रेरणादायी अध्याय जोडला आहे.

> “भोसरी गावचे रहिवासी श्री. नथूमामा सखाजी शितोळे आणि सौ. शांताबाई नथू शितोळे यांनी दुचाकीवरून तब्बल ११ हजार किलोमीटरचा प्रवास करून बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा पूर्ण केली, ही समस्त पिंपरी- चिंचवडकरांसाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. भगवान शंकरावरील अढळ श्रद्धा, दृढ इच्छाशक्ती आणि एकमेकांच्या साथीने त्यांनी हा अनोखा संकल्प पूर्ण केला. त्यांच्या या भक्तिमय प्रवासातून तरुण पिढीलाही जिद्द, साहस आणि ध्येयपूर्तीची प्रेरणा मिळेल. शितोळे दाम्पत्याचे मनःपूर्वक अभिनंदन! - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

भक्तिमय प्रवास!

- यात्रेकरू : श्री. नथूमामा सखाजी शितोळे व सौ. शांताबाई नथू शितोळे
- रहिवासी : भोसरी गाव, पिंपरी-चिंचवड
- यात्रा : बारा ज्योतिर्लिंग दर्शन
- प्रवासाचे अंतर : सुमारे ११ हजार किलोमीटर
- प्रवासाचे साधन : दुचाकी

थोडक्यात पण महत्वाचे

कवठे येमाई तील बारा माऊ बलुतेदार मंडळाचे कार्य गौरवास्पद



■ सामाजिक सलोखा जपत कवठे येमाईच्या विकासात माजी आमदार पोपटराव गावडे यांचे योगदान

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावातील सामाजिक सलोखा जपत सर्व समाजघटकांना सोबत घेऊन गावाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या बाराभाऊ बलुतेदार मंडळाचे योगदान गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांनी केले. कवठे येमाई येथे कोजागिरी पौर्णिमा आणि ग्रामदैवत येमाई देवीच्या पालखी सोहळ्यानिमित्त रविवारी (दि. २५) उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. आकर्षक फुलांनी सजविलेल्या पालखीत देवीची मूर्ती विराजमान करण्यात आली होती. पालखी सोहळ्यानंतर बाराभाऊ बलुतेदार समाजातील युवक, युवती आणि विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीसाठी गावात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक एकोपा, परंपरा जपणे आणि गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आमदार असताना पोपटराव गावडे यांनी गावातील शालेय शिक्षण घेतलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोखले, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, पंचायत समिती सदस्य कांचन सांडभोर, शिरूरच्या माजी नगराध्यक्षा मनीषा गावडे, पोलीस निरीक्षक सुहास रोकडे, पांडुरंग भोर, प्रकाश काका जोशी यांच्यासह बाराभाऊ बलुतेदार मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी जिजामाता विद्यालयाच्या शाहिद फिरोज शेखची निवड

जेजुरी : दैनिक संध्या

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद व क्रीडा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयातील विद्यार्थी शाहिद फिरोज शेख याची १४ वर्षे वयोगटातून निवड झाली आहे. त्याच्या या निवडीमुळे जिजामाता विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाच्या यशाची भर पडली असून, जेजुरीसह पुरंदर तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाहिद याने मेहनत, जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तायक्वांदो या क्रीडा प्रकारातील त्याची कामगिरी, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि मेहनत यामुळे त्याला राज्यस्तरावर आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली आहे. या निवडीमुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. शाहिदला महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, मार्गदर्शक शिक्षक सोमनाथ उबाळे व श्वेतांबर बेलसरे, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक आणि विविध सहशालेय उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. याच प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम शाहिदच्या यशातून दिसून येत आहे. शाहिद फिरोज शेख याच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव मा. आमदार संजयजी चंदुकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्रपंत जगताप यांनी शाहिदचे आणि त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. शाहिदने आगामी राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचा, संस्थेचा, जेजुरीचा आणि पुरंदर तालुक्याचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व विद्यालयातील शिक्षकवृंदाने व्यक्त केल्या.

महर्षी कौंडिण्यऋषी आश्रम प्रकाशझोतात

ग्रामस्थांच्या पुढाकारातून स्वच्छता अभियान

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र थेऊरच्या धार्मिक आणि ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणाऱ्या महर्षी कौंडिण्यऋषी (कपिल ऋषी) आश्रम परिसरात स्वच्छता व जीर्णोद्धार अभियान राबविण्यात आले. काळाच्या ओघात दुर्लक्षित झालेल्या या पवित्र स्थळाकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढली होती. त्यामुळे भाविकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन थेऊरमधील गणेशभक्त आणि ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानातून परिसराची स्वच्छता केली.

पुराणपरंपरेत स्थावर क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र थेऊरला धार्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्री चिंतामणी गणपती बाप्पांचा जन्म, नामकरण आणि गणेशलीलांचा उल्लेख 'चिंतामणी विजय' ग्रंथात असल्याचे सांगितले जाते. याच धार्मिक परंपरेचा आणि पावित्र्याचा वारसा लाभलेल्या थेऊरला 'दक्षिण काशी' म्हणूनही संबोधले जाते. महर्षी कौंडिण्यऋषी आश्रम हे या पवित्र भूमीतील महत्त्वाचे आध्यात्मिक स्थान मानले जाते. या आश्रमाच्या माध्यमातून थेऊरच्या धार्मिक परंपरेचा आणि प्राचीन सांस्कृतिक वारसा याचा परिचय होतो. या उपक्रमामुळे आश्रमाकडे जाणारा मार्ग अधिक सुकर झाला असून, भाविकांना या पवित्र स्थळाला भेट देणे सोयीचे होणार आहे. श्रमदानादरम्यान उपस्थित भाविकांनी या परिसरातील आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला. धार्मिक वारसा संवर्धनाची अपेक्षा श्रीक्षेत्र थेऊरला भेट देणाऱ्या प्रत्येक गणेशभक्ताला येथील प्राचीन धार्मिक स्थळांची माहिती व्हावी, तसेच महर्षी कौंडिण्यऋषी आश्रमाचे महत्त्व व्यापक स्तरावर पोहोचावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. केवळ स्वच्छता करून थांबण्याऐवजी आश्रम परिसराचे नियमित संवर्धन, आवश्यक दुरुस्ती आणि ऐतिहासिक वारसा याचे जतन करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न होण्याची गरज आहे.

थेऊरला प्राचीनकाळी ऋषिमुनी व अनेक देवदेवतांचा अधिवास राहिला असल्याने, धार्मिक वैभवात महत्त्वाचे स्थान आहे. थेऊर येथे असलेल्या सर्व धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन व्हावे, अशी मागणी गणेशभक्त व ग्रामस्थांकडून होत आहे. थेऊर येथील युवा गणेश भक्तांनी स्वयंस्फूर्तपणे सुरू केलेला हा उपक्रम थेऊरच्या पुरातन धार्मिक वारसा जतनासाठी महत्त्वपूर्ण ठरण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



गोद्रे शाळेत 'सुरक्षित बालपण'चा जागर

बालहक्कांसह पॉक्सो कायद्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

■ जुन्नर (दै. संध्या)



तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोद्रे येथे बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी 'सुरक्षित बालपण अभियानांतर्गत' कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना बालहक्क, वैयक्तिक सुरक्षितता आणि बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या उपस्थितीत सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. जुन्नर वकील बार असोसिएशनचे सचिव ॲड. पुराणिक नलावडे, ॲड. तब्बसुम पठाण, ॲड. सलमा सय्यद आणि ॲड. धनश्री कुलवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिरात गुड टच-बॅड टच, बालकांवरील लैंगिक अत्याचारांना प्रतिबंध, पॉक्सो कायदा, बालकांचे अधिकार, वैयक्तिक सुरक्षितता, सायबर सुरक्षा, ऑनलाइन तक्रार नोंदणी प्रक्रिया आणि मोफत कायदेविषयक सहाय्य या विषयांवर जनजागृती करण्यात आली. अनुचित प्रसंग उद्भवल्यास घाबरून न जाता विश्वासू व्यक्तीला माहिती देणे आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर मदत घेणे, याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार दि. २६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सुरक्षित बालपण अभियानाच्या पहिल्या टप्प्यात हा उपक्रम आयोजित करण्यात आला. प्रत्येक बालकाचे संरक्षण, सुरक्षितता आणि कल्याण ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे, शाळेचे मुख्याध्यापक भरत बटवाल, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आनंता काशिनाथ मांडवे, निलेश ठिकेकर, उपसरपंच दिलीप गायकवाड, रमेश रेंगडे, विजया रेंगडे, माधुरी बाणखेले, स्वाती घोडे आणि रेश्मा पानसरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रशांत मोरतळे यांनी केली. सूत्रसंचालन आनंता मांडवे यांनी, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक भरत बटवाल यांनी केले.

प्रतिक गंगणे यांना 'सरदार पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले प्रतिक गंगणे यांना प्रतिष्ठेचा 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रीय एकात्मता दिनाचे औचित्य साधून या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.

पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्टच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करणे, हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे.

येत्या ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत पुण्यातील नवी पेठ येथील संकल्प बँक्वेट हॉल, एलबीएस मार्ग येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला खादी व ग्रामोद्योग विभागाचे राज्यमंत्री दर्जा असलेले अध्यक्ष रवींद्र साठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रतिक गंगणे यांना पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन करण्यात येत आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांना अभिवादन करत विविध क्षेत्रांतील सेवाभावी व्यक्तींचा सन्मान या सोहळ्यात करण्यात येणार आहे. पुरस्काराची माहिती पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांनी दिली.

नारायणगाव महाविद्यालयात ५०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील महाविद्यालयीन आरोग्य विभाग आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्षात शिकणाऱ्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित या आरोग्य तपासणी शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचे वेळेत निदान करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार उपलब्ध करून देणे हा होता. या शिबिरात विद्यार्थ्यांचा बॉडी मास इंडेक्स (BMI), रक्तदाब (BP), रक्तातील साखरेचे प्रमाण आदींची तपासणी करण्यात आली. तसेच विद्यार्थिनींमध्ये वाढत्या ॲनिमियाच्या (रक्तक्षयाच्या) समस्येकडे विशेष लक्ष देण्यात आले. आवश्यकतेनुसार विद्यार्थिनींना आयर्न व फॉलिक ॲसिडच्या गोळ्या देण्यात आल्या. १९ वर्षांखालील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या उपक्रमांतर्गत जंतनाशक औषधांचे वितरण करण्यात आले. सध्याच्या युवा पिढीमध्ये बदलती जीवनशैली, अनियमित आहार, शारीरिक हालचालींचा अभाव तसेच शरीरातील पोषक घटकांची कमतरता यांमुळे उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची जाणीव करून देण्यावर या शिबिरात भर देण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वरूप गिरी, डॉ. मयुरी पाटील,डॉ. मोनाली बांडे आणि डॉ. सुप्रिया काळे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी नियमित तपासणी, योग्य आहार आणि आरोग्यदायी जीवनशैली यांना महत्त्व आहे. महाविद्यालयीन स्तरावर अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होते. महाविद्यालयाचे आरोग्य विभाग समन्वयक प्रा. स्वप्निल कांबळे यांनी सांगितले की, तपासणीदरम्यान आढळलेल्या आरोग्यविषयक समस्यांचे स्वरूप व तीव्रता लक्षात घेऊन संबंधित विद्यार्थ्यांचे वर्गीकरण करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांना पुढील तपासणी किंवा उपचारांची आवश्यकता आहे, त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडी येथे पाठविण्यात येईल, जेणेकरून त्यांना वेळेत योग्य उपचार मिळू शकतील.









ज्ञानसागर गुरुकुलच्या २९ खेळाडूंची जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड

तायक्वांदो, ॲथलेटिक्स, कराटे, स्केटिंग, कुस्ती,मैदानी, बॉक्सिंग आणि वूशु स्पर्धांमध्ये खेळाडूंची दमदार कामगिरी

■ सावळ (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपल्या गुणवत्तेचा आणि मेहनतीचा ठसा उमटविला आहे.विविध शासकीय तालुका,जिल्हा व विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यालयातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हा,विभाग तसेच राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड होण्याचा बहुमान मिळविला आहे. तब्बल २८ खेळाडूंची विविध शासकीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाल्याने ज्ञानसागर गुरुकुलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यालयातील खेळाडूंनी तायक्वांदो, ॲथ लेटिक्स,कराटे,स्केटिंग,कुस्ती,मैदानी स्पर्धा, बॉक्सिंग आणि वूशु या विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली. विशेष म्हणजे काही खेळाडूंनी विभागस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे.

शासकीय तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या सोहेल खान,सुकृत तुपे,कृष्णा सूर्यवंशी,ऋग्वेद वराडे आणि सार्थक ताकमोगे यांनी आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली.या यशाच्या जोरावर या पाचही खेळाडूंची जिल्हास्तरीय शासकीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. शासकीय तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत प्रणव रांधवन याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला.त्याची जिल्हास्तरीय शासकीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच यश मासाळ याने गोळाफेकमध्ये द्वितीय क्रमांक, लखन शिरसट याने थाळीफेकमध्ये तृतीय क्रमांक,वेदांगी भिसे हिने १०० मीटर धावणे प्रकारात द्वितीय क्रमांक,तर समीक्षा म्हेत्रे हिने लांबउडीमध्ये तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.कराटेमध्ये आठ खेळाडूंची चमकदार कामगिरीतालुकास्तरीय शासकीय कराटे स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी प्रभावी कामगिरी केली.अथर्व सचिन भगत आणि श्रीकृष्ण राजेंद्र घाडगे यांनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय शासकीय कराटे स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.त्याचबरोबर मोहित रावी याने द्वितीय क्रमांक,तर अर्णव मटकर, ओम गरजे,कृष्णा गायकवाड आणि जानवी वाघमारे यांनी तृतीय क्रमांक मिळवत विद्यालयाच्या यशात भर घातली.स्केटिंगमध्ये विभागीय स्पर्धेसाठी निवड शासकीय जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत श्रेया गोरे आणि वेदिका बारे यांनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे दोघींचीही विभागीय शासकीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.कुस्तीमध्ये गुंजन गावंडेची जिल्हास्तरीय निवड शासकीय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत गुंजन गावंडे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळविला. तिची जिल्हास्तरीय शासकीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून,तिच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ४ x १०० मीटर रिलेमध्ये संघाची सुवर्णकामगिरी शासकीय तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने ४ x १०० मीटर रिले या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट वेग,समन्वय आणि संघभावनेचे दर्शन घडवत प्रथम क्रमांक पटकावला.या दमदार कामगिरीमुळे संघाची जिल्हास्तरीय शासकीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.संघाच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील भक्कम वाटचालीला आणखी बळ मिळाले आहे.बॉक्सिंगमध्ये तिघांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झेप शासकीय विभागस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या राजवीर कौले, शिवराजे कौले आणि नमन होले या तिन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळविला.

या शानदार कामगिरीमुळे तिन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय शासकीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला राज्यस्तरीय मानांकन मिळाले आहे.

ज्ञानसागर गुरुकुलच्या खेळाडूंनी मिळविलेले हे यश त्यांच्या कठोर परिश्रम,नियमित सराव,शिस्त, आत्मविश्वास आणि जिद्दीचे फलित असल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण असून,सर्व यशस्वी खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.खेळाडूंना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक,प्रशिक्षक, शिक्षकवृंद आणि पालक यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचेही या यशामध्ये महत्त्वपूर्ण योगदान आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांच्यातील गुणवत्ता विकसित व्हावी आणि जिल्हा,विभाग तसेच राज्यस्तरावर विद्यालयाचे नाव उज्ज्वल व्हावे,यासाठी ज्ञानसागर गुरुकुल सातत्याने प्रयत्नशील आहे.

"मैदानावरची जिद्द, सरावातील सातत्य आणि विजयाची भूक — याच जोरावर ज्ञानसागर गुरुकुलची क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचाल सुरू आहे." या सर्व यशस्वी खेळाडूंचे ज्ञानसागर गुरुकुलच्या संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून,आगामी जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी पुढील स्पर्धांमध्येही उत्कृष्ट कामगिरी करत विद्यालयाचे,पालकांचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

वूशुमध्ये सार्थक ताकमोगेची राज्यस्तरीय मजल

शासकीय विभागस्तरीय वूशु स्पर्धेत सार्थक ताकमोगे याने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला.या यशामुळे त्याची राज्यस्तरीय शासकीय वूशु स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तायक्वांदो आणि वूशु या दोन्ही क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत सार्थकने विद्यालयाच्या क्रीडा गुणवत्तेचा विशेष ठसा उमटविला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



२८ व्या कार्यशाळेत ६० हून अधिक भारतीय आणि ७ स्वीडिश कंपन्यांचा सहभाग

पुणे : दैनिक संध्या

स्वच्छ तंत्रज्ञान आणि उद्योगांमधील कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने भारत आणि स्वीडन यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी 'इंडिया–स्वीडन इनोव्हेशन्स ॲक्सिलरेटर' (आयएसआयए) या उपक्रमाची २८ वी कार्यशाळा आज पुण्यात आयोजित करण्यात आली. भारतात नाविन्यपूर्ण स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याच्या संधींवर चर्चा करण्यासाठी या कार्यशाळेत उद्योग क्षेत्रातील प्रमुख प्रतिनिधी, तंत्रज्ञान पुरवठादार आणि शाश्वत विकास क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. इंडिया–स्वीडन इनोव्हेशन्स ॲक्सिलरेटर (आयएसआयए) हा भारत आणि स्वीडन यांच्यात स्वच्छ तंत्रज्ञान आणि हरित ऊर्जा क्षेत्रातील सहकार्याला प्रोत्साहन देणारा महत्त्वपूर्ण द्विपक्षीय उपक्रम आहे. स्वीडिश एनर्जी एजन्सीच्या सहकार्याने आणि बिझनेस स्वीडन – द स्वीडिश ट्रेड अँड इन्व्हेस्ट कौन्सिल तसेच कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री – ग्रीन बिझनेस सेंटर (सीआयआय-जीबीसी) यांच्या भागीदारीत हा उपक्रम राबविण्यात येतो. या माध्यमातून स्वीडनमधील स्वच्छ तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्यास मदत केली जाते. त्याचबरोबर भारतीय उद्योगांना परिणामकारक ठरलेल्या पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची माहिती मिळविणे आणि त्याचा प्रत्यक्ष वापर करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. या कार्यशाळेत ६० हून अधिक भारतीय कंपन्या आणि स्वीडनमधील स्वच्छ तंत्रज्ञान क्षेत्रातील ७ कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ऊर्जा साठवणूक, संसाधनांचा कार्यक्षम वापर, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) आणि डिजिटल उपाययोजना तसेच हरित प्रणोदन तंत्रज्ञानासह पर्यावरणपूरक वाहतूक अशा विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.


जयपूर वॉच कंपनीचे पुण्यातील दुसरे दालन सीझन्स मॉलमध्ये सुरू



पुणे : दैनिक संध्या

प्रसिद्ध घड्याळ निर्माते गौरव मेहता यांनी स्थापन केलेल्या 'जयपूर वॉच कंपनी'ने पुण्यातील सीझन्स मॉलमध्ये आपले दुसरे दालन सुरू केले आहे. भारतीय वारसा, पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक घड्याळ निर्मितीचा अनोखा संगम असलेल्या या ब्रँडच्या वैशिष्ट्यपूर्ण घड्याळांना ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे. 'सी.टी.पंडोल अँड सन्स' यांच्या सहयोगाने हे नवीन दालन सुरू करण्यात आले असून, घड्याळ विक्री क्षेत्रातील ही जयपूर वॉच कंपनीची पहिली व्यावसायिक भागीदारी आहे. गौरव मेहता यांनी स्थापन केलेली जयपूर वॉच कंपनी ही वैशिष्ट्यपूर्ण आणि उच्च दर्जाच्या घड्याळांची आवड असणाऱ्या ग्राहकांसाठी एक खास ब्रँड म्हणून ओळखली जाते. या नवीन दालनात कला आणि उत्कृष्ट कारागिरी यांचा संगम असलेल्या घड्याळांचे खास संग्रह उपलब्ध आहेत. प्राचीन नाण्यांचा वापर करून तयार केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण घड्याळांपासून ते आधुनिक डिझाइनच्या घड्याळांपर्यंत अनेक पर्याय येथे ग्राहकांना पाहायला मिळणार आहेत. भेटवस्तू म्हणून देण्यासाठी एखादे खास घड्याळ असो, वैयक्तिक संग्रहात भर घालण्यासाठी एखादे वेगळे घड्याळ असो किंवा दैनंदिन वापरासाठी आकर्षक आणि आलिशान घड्याळ असो, ग्राहकांच्या विविध आवडीनिवडी लक्षात घेऊन या दालनात घड्याळांची निवड करण्यात आली आहे. जयपूर वॉच कंपनीचे संस्थापक आणि डिझायनर गौरव मेहता यांनी नवीन दालनाच्या उद्घाटनानिमित्त सांगितले, "पुण्यातील ग्राहकांना समृद्ध ऐतिहासिक वारसा, कलात्मकता आणि उत्कृष्ट कारागिरी यांची उत्तम जाण आहे. अशा उत्साही आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहरात आमचा विस्तार होत असल्याचा विशेष आनंद आहे. पुण्यातील या दुसऱ्या दालनाच्या माध्यमातून केवळ घड्याळांची विक्री करणे हा आमचा उद्देश नाही, तर घड्याळ निर्मितीची कला आणि पारंपरिक कारागिरी यांचा अनोखा अनुभव ग्राहकांना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सर्वांचा सुंदर संगम ग्राहकांना एकाच ठिकाणी अनुभवता यावा, ही आमची संकल्पना आहे."

दिवाळीत नात्यांचा गोडवा जपण्यासाठी विवोची '#JoyOfHomecoming' मोहीम



नवी दिल्ली : दैनिक संध्या

दिवाळीच्या सणानिमित्त कुटुंबातील जिव्हाळा, जुन्या परंपरा आणि प्रियजनांसोबत घालवलेल्या क्षणांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विवो इंडियाने '#JoyOfHomecoming' ही नवीन मोहीम सुरू केली आहे. बदलत्या जीवनशैलीत आणि धावपळीच्या जगात माणसे एकमेकांपासून दूर राहत असली, तरी कौटुंबिक परंपरा आणि आठवणी त्यांना पुन्हा एकत्र आणतात, हा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. डेंटसू क्रिएटिव्ह–वेबचटणी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या मोहिमेच्या चित्रपटात आई आणि मुलाच्या नात्यातील भावनिक बंध उलगडण्यात आले आहेत. विवोच्या 'Live the Joy' या संकल्पनेवर आधारित या चित्रपटातून दिवाळीतील छोट्या परंपरांचे मोठे भावनिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. चित्रपटाची कथा दुबईमध्ये नोकरीनिमित्त वास्तव्यास असलेल्या कबीर या तरुणाभोवती फिरते. कामाच्या व्यस्ततेमुळे कबीरला दिवाळीसाठी घरी परतणे शक्य होत नाही. मात्र, छोटी दिवाळीच्या दिवशी त्याचे बालपणीचे मित्र त्याच्या आईसाठी खास सरप्राईज कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमातील क्षण दूरवरून अनुभवताना कबीरचे लक्ष घरातील एका न पेटवलेल्या दिव्याकडे जाते. लहानपणापासून आईसोबत दिवा लावण्याची त्याची परंपरा असते. या आठवणीने भावूक झालेला कबीर अखेर आईसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी घरी परतण्याचा निर्णय घेतो. या कथेतून दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई किंवा उत्सव नसून नात्यांमधील आपुलकी, आठवणी आणि एकत्र येण्याचा आनंद असल्याचा संदेश देण्यात आला आहे. दिवा लावणे, पारंपरिक पदार्थ तयार करणे किंवा कुटुंबातील जुन्या रीतिरिवाजांचे पालन करणे यांसारख्या छोट्या गोष्टींमधून पिढ्यान्पिढ्या नाती अधिक घट्ट होत असल्याचे मोहिमेत दाखविण्यात आले आहे. या मोहिमेबाबत विवो इंडियाच्या मुख्य कॉर्पोरेट कम्युनिकेशन ऑफिसर गीताज चानना म्हणाल्या की, दिवाळी आणि घरी परतण्याचा आनंद विशेष बनवणाऱ्या नात्यांचा आणि परंपरांचा उत्सव साजरा करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. तरुणाई शिक्षण, नोकरी आणि स्वप्नपूर्तीसाठी घरापासून दूर जात असली, तरी कौटुंबिक परंपरा त्यांना आपल्या माणसांकडे परत येण्याची प्रेरणा देतात. मित्र आणि कुटुंबीयांमधील नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डेंटसू क्रिएटिव्ह–वेबचटणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य क्रिएटिव्ह ऑफिसर सुरजो दत्त यांनी सांगितले की, दिवाळी हा माणसांना एकत्र आणणारा सण आहे. आधुनिक जगात करिअर आणि संधींमुळे अनेकांना घरापासून दूर राहावे लागते. मात्र, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संपर्कात राहणे आणि प्रत्यक्ष एकत्र असणे यामध्ये मोठा फरक आहे.

शिर्डीत 'परंपरा साईंची'चा भक्तिमय जल्लोष!

राजेश खर्डे वेसावकर यांच्या कार्यक्रमाची यशस्वी हॅट्ट्रिक; ४० कलाकारांचा सहभाग, गाडीलकर साहेबांच्या हस्ते कलाकारांचा सन्मान

■ शिर्डी (दै. संध्या)



साईभक्ती, संगीत, नृत्य आणि अभिनयाचा सुरेल संगम घडविणारा 'परंपरा साईंची' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम नुकताच शिर्डी येथे उत्साहात पार पडला. राजेश खर्डे वेसावकर प्रस्तुत आणि भूमी निर्मित या कार्यक्रमात सुमारे ४० कलाकारांनी सहभाग घेत आपल्या कलाविष्काराने उपस्थित साईभक्त आणि रसिकांची मने जिंकली. साई संस्थानच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमाला यंदाही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भक्तिमय वातावरणात सादर झालेल्या विविध कलाप्रकारांनी कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमानंतर शिर्डी संस्थानचे सदस्य व्यवस्थापाक गाडीलकर साहेब यांच्या शुभहस्ते सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फटांगरे साहेब यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमात गायक विकी अडसुळे, स्वाती हरवंदे, दीपा नंदलसकर, राज पाटील आणि पौर्णिमा शिंदे यांनी आपल्या गायनातून भक्तिरसाची अनुभूती दिली. कार्यक्रमाचे प्रभावी निवेदन राकेश नाईक यांनी केले, तर नृत्यदिग्दर्शनाची जबाबदारी संजय आदित्य यांनी सांभाळली. विनोद पाटील आणि शशिकांत जाधव यांनी आपल्या भूमिका साकारत कार्यक्रमाच्या सादरीकरणात विशेष रंग भरला. संगीत संयोजनाची जबाबदारी आई एकविरा – रिदम बिट्स यांनी सांभाळली. या संपूर्ण कलात्मक प्रवासाला गुरुवर्य राजा लाकडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या सादरीकरणाबाबत संस्थानच्या संबंधित व्यवस्थापक आणि दिग्दर्शकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमातील कलाकारांचे सादरीकरण आणि नियोजनाबद्दल प्रशंसा करण्यात आली. भविष्यातही अशा कार्यक्रमासाठी पुन्हा संधी देण्याची तयारी दर्शविण्यात आल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. राजेश खर्डे वेसावकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'परंपरा साईंची' या कार्यक्रमाने साईबाबांच्या भक्तीपरंपरेचा सांस्कृतिक वारसा प्रभावीपणे जपला. संगीत, नृत्य, अभिनय आणि भक्ती यांची सुंदर सांगड घालत या कार्यक्रमाने शिर्डीच्या सांस्कृतिक वातावरणात विशेष रंग भरला. साईभक्तीचा भाव, कलाकारांची साधना आणि रसिकांची उत्स्फूर्त दाद यांमुळे 'परंपरा साईंची' हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. कलाकारांचा झालेला सन्मान आणि भविष्यात पुन्हा संधी मिळण्याची शक्यता यामुळे राजेश खर्डे वेसावकर आणि त्यांच्या संपूर्ण कलावंतांच्या चमूचा उत्साह वाढला आहे.

एआई प्लस स्मार्टफोनची निवडक मॉडेल्सच्या किमतीत १५ नोव्हेंबरपासून वाढ जाहीर

■ पुणे (दै. संध्या)



एआय प्लस स्मार्टफोनने आज आपल्या स्मार्टफोन पोर्टफोलिओमधील निवडक मॉडेल्सच्या किमतीत 15 नोव्हेंबर 2026 पासून वाढ करण्याची घोषणा केली. विशेषतः किमतीबाबत संवेदनशील विभागांमध्ये खर्चाचा दबाव कायम असल्याने, कंपनीने त्याच्या परिणामांचे मूल्यमापन सुरू ठेवले असून ग्राहकांसाठी परवडणारी किंमत राखण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, कच्च्या मालाचा खर्च उच्च पातळीवर कायम असल्याने, परवडणारी किंमत आणि उत्पादनाचा अनुभव यांच्यातील शाश्वत समतोल राखण्यासाठी कंपनीने आणखी एक संयमित किंमत समायोजन केले आहे. किमती ₹3,000 पर्यंत वाढणार असल्याने, ग्राहकांसाठी त्यांचे आवडते एआई प्लस स्मार्टफोन सध्याच्या किमतीत खरेदी करण्याची हीच उत्तम वेळ आहे. सुधारित किमतींनुसार, एआय पल्स पल्स २ एफई, पल्स २ , नोव्हा २ निओ ५जी, नोव्हा २ पॉवर ५जी, नोव्हा २ प्रो ५जी आणि नोव्हा २ अल्ट्रा ५जी च्या निवडक व्हेरिएंट्सच्या किमतीत ₹1,000 ते ₹3,000 पर्यंत वाढ होईल. एआय पल्स नोव्हाफ्लिप ५जी ची किंमत ₹49,999 वर कायम राहील. उद्योगासमोरील आव्हाने असूनही, एआय प्लस स्मार्टफोन भारतीय ग्राहकांना उत्तम किंमत-अनुभव मूल्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. कंपनी घटकांच्या किमती आणि बाजारातील स्थितीवर लक्ष ठेवत राहील आणि सुलभ तंत्रज्ञान, विश्वासार्ह कामगिरी व ग्राहकांसाठी दीर्घकालीन मूल्य यावर आपले लक्ष केंद्रित ठेवेल.

इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष अशा फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोनची सुरुवात

■ मुंबई (दै. संध्या)

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे प्रथमच अनोख्या अशा फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या नाविन्यपूर्ण ऑटो कार लोनची सुरुवात केली असून ही योजना विशेषरुपाने इलेक्ट्रिक व्हेईकल्स (ईव्हीज) च्या खरेदीसाठी अर्थपुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या योजने अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांच्या बॉडी आणि बॅटरी साठी वेगवेगळ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. यामध्ये बॅटरी वरील कर्ज हे फेडण्यासाठी ग्राहकांना अधिक कालावधी मिळणार आहे. यामुळे ग्राहकांना ईएमआय अधिक चांगल्या प्रकारे भरणे शक्य होणार आहे. ही कर्ज उत्पादन सुविधा बँकेच्या संपूर्ण भारतात असलेल्या ९७०० हून अधिक शाखांमध्ये उपलब्ध असणार आहे. ईव्हीच्या सध्याच्या खर्चाच्या रचने मुळे आयसीई (इंटर्नल कंबश्चन इंजिन) च्या तुलनेत बॅटरीचे वाहन घेणे खर्चिक बाब ठरते, कारण इलेक्ट्रिक वाहनांमध्ये बॅटरी हा घटक सर्वात महाग घटक आहे. बॅटरीसाठीचा ईएमआयचा हिस्सा हा आयसीई वाहनाच्या चालवण्याच्या खर्चा एवढा असेल. हा दृष्टिकोन विकसित होत असलेल्या बॅटरी सबस्क्रिप्शन मॉडेल्ससाठी देखील योग्य आहे, ज्यामुळे ईव्हीची मालकी अधिक सुलभ आणि किफायतशीर बनते. एचडीएफसी बँकेच्या फ्लेक्झी ग्रीन लोन ची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे :

- केवळ ईव्ही खरेदीसाठी तयार केलेली योजना – फ्लेक्सी इलेक्ट्रिक कार लोन योजना ही खास ईव्ही खरेदी सुलभ करण्यासाठी तयार करण्यात आलेली योजना आहे.
- भिन्न कर्ज कालावधी – निवडक पध्दतीने तयार करण्यात आलेला खर्च
- ईव्हीच्या विस्तृत श्रेणीमध्ये प्रवेश – ग्राहकांना आघाडीच्या ओईएमच्या ईव्ही बुक करण्याचा पर्याय मिळेल.

या योजनेच्या सुरुवाती विषयी माहिती देतांना एचडीएफसी बँकेच्या रिटेल ॲसेट्स आणि रुरल बँकिंगचे ग्रुप हेड श्री. अरविंद वोहरा यांनी सांगितले " भारतात ईव्ही क्रांती वेगाने गती घेत आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे सरकारी प्रोत्साहन, सुधारीत तंत्रज्ञानाचा आग्रह आणि योग्य धोरणांच्या आधार होय. भारत ईव्ही क्रांतीचा स्विकार करण्यास सज्ज आहे. आमचा असा दृढ विश्वास आहे की आमचे फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन ईव्ही गाडीची मालकी अधिक चांगली, अजोड आणि त्रासमुक्त करण्यात महत्त्वपूर्ण भुमिका बजावेल."

नुकत्याच मिळालेल्या अहवालानुसार भारतात ईव्हीचा वापर वेगाने वाढू लागला आहे. २०३० पर्यंत ईव्ही प्रकारच्या वाहनांचा वापर हा सध्याच्या ७ टक्क्यांवरुन वाढून १५-२० टक्क्यांवर पोहोचण्याची शक्यता आहे. त्याच बरोबर भारत सरकारने २०३० पर्यंत ३० टक्के इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्याचे लक्ष्य समोर ठेवल्याने देशात ईव्हीचा वापर वाढीस लागेल त्याच बरोबर बॅटरी तंत्रज्ञानातील सुधारणांसह ओईएम्स कडून उत्पादन श्रृंखलांतील वाढीमुळे ईव्हीचा वापरही वाढू लागेल.

अग्रगण्य बँकांच्या भागीदारीसह फोनपे तर्फे 'तत्काळ एनपीएस' लाँच

निवृत्ती नियोजनासाठी मायक्रो-इन्व्हेस्टमेंटची (अल्प गुंतवणुकीची) सुविधा उपलब्ध

■ पुणे (दै. संध्या)

फोनपे ने आज आपल्या प्लॅटफॉर्मवर अग्रगण्य बँकिंग संस्थांच्या भागीदारीतून 'तत्काळ एनपीएस' (नॅशनल पेन्शन सिस्टीम) लाँच केल्याची घोषणा केली. दीर्घकालीन निवृत्ती नियोजन सर्वसामान्यांपर्यंत सहज पोहोचवणे हा यामागचा उद्देश आहे. आपल्या सर्वसमावेशक आर्थिक सेवांचा विस्तार करत, फोनपे ची ही नवी सुविधा देशभरातील लाखो वापरकर्त्यांना अवघ्या ₹250 च्या सुरुवातीच्या मायक्रो-कॉन्ट्रीब्युशनसह (अल्प योगदानासह) सरकारमान्य पेन्शन खाते उघडण्याची संधी उपलब्ध करून देते.

या लाँचमुळे वापरकर्ते आता एका अत्यंत सोप्या आणि 100% डिजिटल प्रक्रियेद्वारे सुरक्षितपणे स्वतःचे एनपीएस खाते तयार करू शकतात; ज्यामुळे पेन्शन खाते उघडण्यामधील सर्व अडथळे दूर झाले आहेत. हा विनाअडथळा अनुभव देण्यासाठी फोनपे ने भारतातील आघाडीच्या बँकिंग संस्थांसोबत इंटिग्रेशन केले असून, संपूर्ण बँकिंग क्षेत्रात याचा विस्तार करण्याची कंपनीची योजना आहे. पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण द्वारे विकसित करण्यात आलेली 'तत्काळ एनपीएस ' ही अभिनव सुविधा सुरक्षित वन-टाइम ओटीपी प्रमाणीकरणाद्वारे बँकेच्या अस्तित्वात असलेल्या केवायसी थेट पुनर्वापर करण्यास सुरू करते. या प्रणालीमुळे फोनपे आपल्या वापरकर्त्यांना एक सोपा आणि पेपरलेस ऑनबोर्डिंग अनुभव देते, ज्यायोगे वापरकर्त्यांना अवघ्या काही मिनिटांत त्यांचा 'पर्मनंट रिटायरमेंट अकाउंट नंबर' मिळवता येतो. तत्काळ एनपीएस देशभरातील सर्व घटकांसाठी, विशेषतः पहिल्यांदाच निवृत्तीचे नियोजन करणारे, मिलेनिअल्स आणि जनरेशन-झेड यांच्यासाठी अत्यंत उपयोगी आहे. गुंतवणुकीची किमान मर्यादा थेट ₹250 पर्यंत कमी करून, फोनपे भारताच्या तरुण पिढीला अगदी सुरुवातीच्या टप्प्यापासूनच स्वतःची पेन्शन आणि निवृत्ती सुरक्षा निर्माण करण्यास सक्षम करत आहे. विशेषतः गिग इकॉनॉमी वर्कर्स, स्वतंत्र फ्रीलान्सर्स आणि लहान व्यावसायिक, ज्यांच्याकडे अनेकदा अनिवार्य कॉर्पोरेट निवृत्ती योजनांचा लाभ नसतो, अशा घटकांसाठी ही सुविधा एक अत्यंत महत्त्वाची आणि शिस्तबद्ध निवृत्ती योजना ठरेल. या लाँचबद्दल बोलताना फोनपे चे व्हॉइस प्रेसिडेंट आणि हेड ऑफ पेमेंट्स दीप अगरवाल म्हणाले, "फोनपे मध्ये आमचे उद्दिष्ट प्रत्येक भारतीयाला आर्थिक सेवांचा सुलभ ॲक्सेस मिळवून देत त्यांची आर्थिक प्रगती गतिमान करणे हे आहे. 'तत्काळ एनपीएस ' चे लाँच हे सामान्य जनतेपर्यंत दीर्घकालीन आर्थिक नियोजन आणि निवृत्ती सुरक्षा पोहोचवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही संपूर्ण प्रक्रिया 100% डिजिटल आणि सुलभ करून, तसेच पीएफआरडीए च्या मार्गदर्शनाखाली भारतातील अत्यंत विश्वासू बँकांशी भागीदारी करून, आम्ही संपूर्ण भारतामध्ये पूर्ण विश्वास, सुरक्षितता आणि सोयीसह अधिकृत निवृत्ती नियोजन उपलब्ध करून देत आहोत."

३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर

■ मुंबई (दै. संध्या)



बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना दीपावली - २०२६ प्रीत्यर्थ ३३ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांनी आज (दिनांक २८ ऑक्टोबर २०२६) केली. महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दीपावलीचा सण आनंदात साजरा करता यावा, या उद्देशाने नोव्हेंबर महिन्याच्या नियमित वेतनासोबत ३३ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान अदा करण्याचे निर्देश महापौर श्रीमती रितू तावडे यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिले. दीपावली - २०२६ करीता महानगरपालिका अधिकारी / कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतची बैठक आज (दिनांक २८ ऑक्टोबर २०२६) महापौर दालनात झाली. उपमहापौर श्री. संजय घाडी, विरोधी पक्षनेत्या श्रीमती किशोरी पेडणेकर, सभागृहनेते श्री. गणेश खणकर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे गटनेते श्री. अशरफ आजमी, एआयएमआयएम गटनेते श्री. विजय उबाळे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गटनेते श्री. यशवंत किल्लेदार, समाजवादी पक्षाच्या गटनेत्या श्रीमती अमरीन अब्रहानी, स्थायी समिती अध्यक्ष श्री. प्रभाकर शिंदे, शिक्षण समिती अध्यक्ष श्रीमती राजेश्री शिरवडकर, सहआयुक्त (वित्त) श्री. देविदास क्षिरसागर, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) श्री. किशोर गांधी यांच्यासह महानगरपालिका कामगार / कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. महापौर श्रीमती रितू तावडे म्हणाल्या की, राज्यात यंदा कमी पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने निकषांनुसार राज्यातील ३०० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. राज्यातील या परिस्थितीचा सारासार विचार करून महानगरपालिकेतील गटनेते, पदाधिकारी, महानगरपालिका प्रशासन आणि कामगार-कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना ३३ हजार रुपयांचे दीपावली सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला आहे.

७०व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करावे

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे निर्देश : वाहतूक, रेल्वे, आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेच्या प्रभावी व्यवस्थापनावर भर

■ मुंबई (दै. संध्या)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी मुंबईत अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने नियोजन करावे, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले.


महापरिनिर्वाण दिनानिमित्त शिवाजी पार्क परिसरासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांच्या व स्मारकांच्या ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा आणि ड्रोनचा वापर करावा. तसेच, वाहतुकीतील बदलांची माहिती नागरिकांना आगाऊ देऊन आवश्यक नियोजन करावे, अशा सूचना बनसोडे यांनी केल्या. दादर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कुर्ला, वांद्रे आणि मुंबई सेंट्रल या रेल्वे स्थानकांवर गर्दी नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करावी. अनुयायांच्या सोयीसाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त रेल्वेगाड्या सोडाव्यात आणि ६ डिसेंबर रोजी मेगाब्लॉक टाळण्याबाबत रेल्वे प्रशासनाने विचार करावा. तसेच, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने अतिरिक्त बससेवेचे नियोजन करावे, अशी विनंती करण्यात आली.

सार्वजनिक आरोग्य विभागाने ५ व ६ डिसेंबर रोजी वैद्यकीय तपासणी, आरोग्य जनजागृती आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे. परिसरात स्वच्छता राखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. ६ डिसेंबर रोजी राज्यात 'ड्राय डे' घोषित करण्याबाबत तसेच सार्वजनिक सुट्टीसंदर्भातील परिपत्रक आगाऊ प्रसिद्ध करण्याबाबतही संबंधित विभागांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे सुचविण्यात आले. सामाजिक न्याय विभागाने वृत्तपत्रांमधून विशेष जाहिराती प्रसिद्ध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करावा. शिवाजी पार्क परिसरात पुस्तकांचे स्टॉल उभारून विभागाच्या विविध योजनांची माहिती अनुयायांपर्यंत पोहोचवावी, असेही निर्देश देण्यात आले. महापरिनिर्वाण दिनाच्या व्यवस्थेसाठी अंदाजे २५ ते ३० कोटी रुपयांचा निधी आवश्यक ठरू शकतो. त्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने आवश्यक निधीची तरतूद आणि प्रशासकीय मंजुरीसंदर्भातील कार्यवाही वेळेत पूर्ण करावी, असे उपाध्यक्ष बनसोडे म्हणाले. या बैठकीस गृह विभाग, सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी, चैत्यभूमी समन्वय समिती सदस्य उपस्थित होते.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



सासवड कोंढवा रस्त्यावर टेम्पोच्या धडकेत पिसर्वे गावचा युवक ठार

■ सासवड (दै. संध्या)



भरधाव ४०७ टेम्पोने दुचाकीला मागून धडक दिल्याने एका २५ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. बुधवारी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता सासवड कोंढवा रस्त्यावर भिवरी बोपगाव दरम्यान ९९बेकरी नजीक हा अपघात झाला. गिरीश गोरख कोलते राहणार पिसर्वे असे मृत तरुणाचे नाव आहे. बाळासाहेब राऊ कोलते यांनी याबाबत सासवड पोलिसांना फिर्याद दिली आहे.

या घटनेचे वृत्त गिरीश कोलते हा पिसर्वेवरून आपल्या पल्सर दुचाकीवरून (क्र एम एच १२ झेड झेड ३५८६) हिंजेवाडी येथे कामासाठी निघाला होता. सकाळी नऊच्या सुमारास बोपगाव भिवरी दरम्यान ९९ नावच्या बेकरीजवळ मागून येणाऱ्या ४०७ टेम्पो (क्र. एम एच ०२ ई आर २०३२) ने त्याला जोराची धडक दिली त्यात गिरीश जागीच मृत्यू पावला. विशेष म्हणजे टेम्पो चालक न थांबता पळून गेला आहे. सासवड पोलीसस्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जाधवर अधिक तपास करत आहेत. मृत गिरीश याच्या मागे पत्नी, एक छोटी मुलगी, आई व बहीण असा परिवार असुन त्याच्या वडिलांचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. एकुलत्या एक मुलाच्या अपघाती मृत्यूने पिसर्वे गावावर शोककळा पसरली आहे. पिसर्वे येथे दुपारी तीन वाजता शोकाकुल वातावरणात गिरीश याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

चौफुला कालव्यावरील वाहतूक कोंडी आणि पडवी

घाटातील जीवघेणे अपघात थांबणार

आमदार राहुल कुल यांचा मंत्र्यांकडे पाठपुरावा, प्रशासनाला तातडीच्या सूचना!

■ यवत (दै. संध्या)



केडगाव ते सुपे राज्य मार्ग क्र. ११८ वरील बोरीपार्धी - चौफुला येथील कालव्यावर नवीन मोठा पूल बांधावा आणि पडवी - सुपे दरम्यानच्या धोकादायक घाट रस्त्याची तातडीने सुधारणा करावी, अशी आग्रही मागणी दौंड विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. राहुल कुल यांनी केली आहे. या महत्त्वपूर्ण कामांसाठी त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची मंत्रालयात भेट घेऊन चर्चा केली व त्यांना या कामांचे लेखी निवेदन दिले. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी या दोन्ही मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुणे मुख्य अभियंत्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

केडगाव - सुपे राज्य मार्ग हा दौंड तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रचंड वर्दळीचा मार्ग म्हणून ओळखला जातो. या मार्गावर बोरीपार्धी - चौफुला येथे नवीन मुठा उजव्या कालव्यावर सध्या ३ गाळ्यांचा पूल आहे. मात्र, हा पूल अतिशय अरुंद असल्याने दोन जड वाहने एकाच वेळी समोरासमोरून जाऊ शकत नाहीत. परिणामी येथे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते आणि अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर हडपसर ते यवत दरम्यान उन्नत महामार्ग (Flyover Highway) प्रस्तावित आहे. त्याचे काम सुरू झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गावरील सर्व वाहतूक या केडगाव-सुपे राज्य मार्गावर वळवली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतुकीचा ताण लक्षात घेता, या पुलाचे तातडीने रुंदीकरण करून येथे नवीन मोठा पूल उभारणे अत्यंत गरजेचे असल्याचे आमदार राहुल कुल यांनी निवेदनात ठळकपणे नमूद केले आहे.

याच मार्गावरील पडवी ते सुपे दरम्यानच्या घाटात तीव्र चढ-उतार आणि धोकादायक वळणे आहेत. वळणांवर रस्त्याचा आवश्यक उतार (सुपर एलिव्हेशन) पुरेसा नसल्याने चढ चढताना जड वाहने मागे घसरतात. अनेकदा चालक विरुद्ध लेनमध्ये जाऊन चढण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे समोरासमोर भीषण अपघात होतात. तीव्र वळणांवर चालकांचा ताबा सुटून वाहने थेट दरीत कोसळल्याच्या शेकडो घटना येथे घडल्या आहेत. त्यामुळे आवश्यक भूसंपादन आणि घाट कटिंग करून या रस्त्याची रचना आणि चढाची तीव्रता (ग्रेडियंट) सुधारण्याचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी आमदार कुल यांनी केली.

आमदार राहुल कुल यांच्या या अभ्यासपूर्ण आणि आग्रही मागणीनंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी तातडीने पुणे विभागाच्या मुख्य अभियंत्यांना यावर प्रस्ताव तयार करून पुढील पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही प्रलंबित आणि महत्त्वाच्या कामांना लवकरच गती मिळण्याची चिन्हे आहेत.

> "केडगाव-सुपे मार्गावरील चौफुला पूल आणि पडवी-सुपे घाट हे दोन्ही ठिकाण सध्या नागरिकांच्या जीवितासाठी धोकादायक बनले आहेत. प्रस्तावित उन्नत महामार्गाच्या कामामुळे या मार्गावरील वाहतूक आणखी वाढणार आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी ही कामे लवकरात लवकर मंजूर करून ती मार्गी लावण्यासाठी शासनाकडे माझा सातत्याने पाठपुरावा राहील."
> **- ॲड. राहुल कुल (आमदार, दौंड विधानसभा)**

थोडक्यात पण महत्वाचे



विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र देवकाते यांची निवड

निरावागज : दैनिक संध्या

निरावागज नं. २ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित,निरावागज या संस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र देवकाते यांची निवड करण्यात आली.या निवड प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पद्मश्री शिंदे यांनी काम पाहिले. या निवडीप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वासराव देवकाते, दि.माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक मदनराव देवकाते,गुलाबराव देवकाते,ज्ञानदेव देवकाते,सुरेश देवकाते,बाळासाहेब देवकाते, चंद्ररराव देवकाते,जयपाल देवकाते, विलास देवकाते,मोहन धायगुडे, काकासो देवकाते,विठ्ठल देवकाते, रमेश देवकाते,उद्धव डोंबाळे,महेश डोंबाळे,गणेश मारकड,नंदकुमार भोसले आणि अलीभाई यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन राजेंद्र देवकाते यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या माध्यमातून सभासदांचे हित जपणे,शेतकऱ्यांना सहकार्य करणे आणि सहकार क्षेत्रातील संस्थेची प्रगती साधणे यासाठी नवनिर्वाचित चेअरमन राजेंद्र देवकाते यांच्या नेतृत्वाखाली सकारात्मक कार्य होईल,अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

दिवे घाटात रुंदीकरणाच्या कामामुळे रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष



दिवे घाट : दैनिक संध्या

दिवे घाटात महामार्गाचे काम वेगात सुरू आहे, मोठ मोठ्या अवजड यांत्रिक मशीन द्वारे हे काम चालू आहे. मात्र याच अवजड मशिनींच्या वाहनांमुळे दिवे घाटात रस्त्याची दुरावस्था झाली आहे. मशिनींच्या लोखंडी चाकांमुळे रस्त्याला उभ्या आडव्या खड्ड्यांची माळच तयार झाली आहे. याशिवाय धबधब्याचा वळणावर रस्ता पूर्णपणे उखडला आहे. तीव्र उताराने वेगात येणाऱ्या वाहन चालकांना खराब रस्त्यामुळे वाहन नियंत्रित करणे अवघड होत आहे. खराब रस्त्यामुळे दुचाकी चालकांची दयनीय अवस्था होत आहे. घाट मार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक सुरू असलेल्या रस्त्याची तात्पुरती डागडुजी करावी अशी मागणी वाहनचालक करीत आहेत. खराब रस्त्यामुळे एखादा जीवघेणा अपघात होऊ नये यासाठी ही खराब रस्त्याची दुरुस्ती तातडीने करावी अशी मागणी पुरंदर बस प्रवासी संघाचे अध्यक्ष तानाजी सातव यांनी केली आहे.

डॉ. मेहबूब सैय्यद यांचा उद्योगरत्न पुरस्काराने सन्मान



चाकण : दैनिक संध्या

रोजगार व स्वयंरोजगार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल येथील टीएसपीएल ग्रुपचे अध्यक्ष डॉ. मेहबूब सैय्यद यांचा उद्योगरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. डॉ. सैय्यद यांना राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. सैय्यद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. रोजगार निर्मिती, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन व चालना देणे या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाची दखल या सन्मानाच्या माध्यमातून घेण्यात आली. टीएसपीएल ग्रुपच्या माध्यमातून विविध उद्योगांना मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, युवकांना रोजगाराच्या संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच कौशल्य विकास आणि अप्रेंटिसशिपच्या माध्यमातून तरुणांना करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य केले जाते. डॉ. सैय्यद यांच्या नेतृत्वाखाली या ग्रुपने रोजगार व मनुष्यबळ विकास क्षेत्रात आपले कार्य विस्तारले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करणारा उद्योगरत्न पुरस्कार हा संस्थेसाठी तसेच रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वांसाठी अभिमानाचा क्षण मानला जात आहे. या राष्ट्रीय अधिवेशनाला समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप व विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



एकल महिला नोंदणी मेळावा उत्साहात संपन्न; ३५ महिलांचा सहभाग

■ नारायणगाव (दै. संध्या)

श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्राच्या माध्यमातून (दि. १५) रोजी पिंपरी कावळ येथे एकल महिला नोंदणी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जुन्नर तालुक्यातील विविध गावांमधील एकूण ३५ महिलांनी सहभाग घेतला. पिंपरी कावळ, जांबुत, औरंगपूर, पारगाव तर्फे आळे यांसह परिसरातील गावांमधील महिलांनी या मेळाव्यात उपस्थित राहून नावनोंदणी केली. विधवा, निराधार व घटस्फोटित महिलांसह नियमानुसार पात्र असलेल्या एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. नोंदणीकृत महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, कायदेशीर मार्गदर्शन व संरक्षण मिळवण्यासाठी मदत करणे, तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, यावर या उपक्रमात भर देण्यात आला. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत पात्र महिलांची बंद झालेली पेन्शन पुन्हा सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करणे, तसेच नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा आयोजकांचा मानस आहे. या मेळाव्याचे आयोजन श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण संस्थापक अध्यक्ष. दीपक चव्हाण आणि पिंपरी कावळ मळगंगा बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती वनिता रोहिदास पाबळे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

विद्युत तारांच्या घर्षणाने ऊसाला आग; २० एकर ऊस जळून खाक!

खंडोबाचीवाडीतील घुमट वस्ती परिसरात भीषण आग; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान, डीपी हटविण्याची मागणी

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील खंडोबाचीवाडी येथील घुमट वस्ती परिसरात मंगळवारी (दि. २७) दुपारी उसाच्या शेताला अचानक आग लागून सुमारे २० एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला.या आगीत अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून,आधीच पाण्याच्या टंचाईने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे.विद्युत तारांच्या घर्षणामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात असून,संबंधित क्षेत्रातील विद्युत रोहित्र (डीपी) तातडीने अन्यत्र हलविण्याची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.दुपारच्या सुमारास उसाच्या शेतात अचानक आग लागली.ऊस उंच आणि दाट असल्याने आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले.आगीचा वेगाने फैलाव झाल्याने मोठ्या क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला. अनेक महिन्यांच्या मेहनतीने वाढवलेले पीक डोळ्यांदेखत जळताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली.या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच पाण्याची टंचाई,त्यात आगीचे संकट! बारामती तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाअभावी आणि पाण्याच्या टंचाईमुळे शेती अडचणीत आली आहे.उपलब्ध पाण्यावर ऊस पीक जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे.अशा परिस्थितीत आगीमुळे उभे पीक जळून गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.ऊस हे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन असल्याने या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. डीपीमुळे वारंवार आग लागल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

घुमट वस्ती परिसरातील शेतात उभ्या असलेल्या विद्युत रोहित्रामुळे (डीपी) यापूर्वीही तीन वेळा ऊस जळाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे या ठिकाणी असलेला डीपी तातडीने अन्यत्र हलविण्यात यावा,अशी मागणी त्यांनी केली आहे.विद्युत तारांच्या घर्षणामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त होत असली,तरी आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्या! या आगीत दगडे नानासो यशवंत, दगडे दादासो यशवंत,येळे तुळशीराम साहेबराव,गडदरे मयूर सखाराम,येळे बाळासो आबाजी, लोखंडे शालन,लोखंडे लक्ष्मण आणंदराव,महानवर आप्पा बिरू, दगडे शिवाजी यशवंत,दगडे आनंदराव यशवंत, महानवर संपत बिरू,ठोंबरे जन्याबा भिवा,येळे संतोष उमाजी आणि दगडे वामन बाबा यांच्यासह इतर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.संबंधित वीज वितरण कंपनी आणि महसूल विभागाने घटनास्थळाची पाहणी करून आगीचे नेमके कारण स्पष्ट करावे.जळालेल्या उसाचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार भरपाई द्यावी,तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी संबंधित डीपी अन्यत्र हलवावा,अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्यात संघटन विस्ताराची मोहीम!

■ कवठे येमाई (दै. संध्या)



समाजहित, जनसेवा, कायदेशीर मदत आणि पोलीस व नागरिक यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने पोलीस मित्र संघ महाराष्ट्र यांच्या वतीने सदस्य व पदाधिकारी नोंदणी मोहीम राबविण्यात येत आहे. इच्छुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि जनसेवेची आवड असलेल्या व्यक्तींनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष शाम घाडगे,उपाध्यक्ष प्रा.सुभाष शेटे,राष्ट्रीय महिला अध्यक्षा श्रीमती वर्षाताई नाईक यांनी केले आहे.संघाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सदस्य व पदाधिकाऱ्यांसाठी विविध नोंदणी पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये ओळखपत्र, पी.व्ही. सी. कव्हर किचन, वाहन स्टिकर, प्रिंटेड लेटर व माहितीपत्रक यांसारख्या साहित्याचा समावेश आहे. उच्चस्तरीय किटमध्ये बॅज, पेन, जॅकेट आदी साहित्याचाही समावेश आहे.देणगी देणा-या सदस्य,पदाधिकाऱ्यांना संघास देणगी दिल्यास कर सवलत प्राप्त होईल.अधिकची देणगी देणाऱ्या व्यक्तीस कर सवलत प्रमाणपत्र उपलब्ध होईल. नोंदणीसाठी आधारकार्डची प्रत, पासपोर्ट आकाराचे एक किंवा दोन फोटो, रक्तगटाची माहिती, संपूर्ण पत्ता व पिनकोड आवश्यक असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. देणगी शुल्क भरल्यानंतर देणगी पावती किंवा स्क्रीनशॉट पाठविण्याची सूचनाही देण्यात आली आहे.पोलीस मित्र संघाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम, जनजागृती,महिला सक्षमीकरण,बेरोजगारांना रोजगार मिळणे कामी मदत,वंचित,पीडित शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार ,नागरिकांना कायदेशीर मदतीबाबत मार्गदर्शन आणि समाजात सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.



चाकण येथे स्व. विद्यावत्सल यांना अभिवादन

■ चाकण (दै. संध्या)

अखिल भारतीय विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष स्व. विद्यावत्सल यांना चाकण येथे किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान संचलित गुरुवर्य विद्यावत्सल ग्रंथालय व अभ्यासिका यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष - ॲड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते स्व. विद्यावत्सल त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राहुल वाडेकर, ऋषिकेश बुचुडे, सत्यवान तांबे, राजू दीक्षित, योगेश साखरे, शैलेश कड, अनंत देशमुख, संतोष लोणारी, राजू खरमाटे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. किरण झिंजुरके यांनी यावेळी विद्यावत्सल यांच्या कार्याचा गौरव केला.

'द ट्रॅप'ची गोव्यात बाजी ! रामकुमार शेडगे यांना 'उत्कृष्ट दिग्दर्शक' पुरस्कार

प्रयोगशील दिग्दर्शनाला गोव्याची दाद; 'द ट्रॅप'साठी रामकुमार शेडगे सन्मानित

■ पुणे (दै. संध्या)



थरार, रस्य आणि आधुनिक शहरी जीवनातील वास्तव यांची सांगड घालणाऱ्या 'द ट्रॅप' या वेब सिरीजसाठी लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांना 'उत्कृष्ट दिग्दर्शक (एक्सपेरिमेंटल)' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १३ व्या गोवा शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशामुळे मराठी मनोरंजन क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीला आणखी एक महत्त्वपूर्ण सन्मान मिळाला आहे. 'द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स' या निर्मिती संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेली 'द ट्रॅप' ही वेब सिरीज थरारक आणि रहस्यमय कथानकावर आधारित आहे. सध्या तरुणाईला आकर्षित करणारी नाइट लाइफ, पबिंग, पार्ट्या आणि मौजमस्तीच्या जगात एक तरुणी कशी अडकते, या वातावरणातून तिच्यासमोर कोणती आव्हाने उभी राहतात आणि ती या चक्रव्यूहात कशी फसते, याचे चित्रण या सिरीजमध्ये करण्यात आले आहे. आधुनिक जीवनशैलीच्या आकर्षक दिसणाऱ्या बाजूमागील धोक्यांवरही ही कथा प्रकाश टाकते. या वेब सिरीजमध्ये अभिनेत्री जानकी आर, रामकुमार शेडगे, केतन पेंडसे, अमोल भगत यांच्यासह अनेक कलाकारांच्या भूमिका आहेत. छायाचित्रणाची जबाबदारी आकाश भापकर यांनी सांभाळली असून, लेखन आणि दिग्दर्शन रामकुमार शेडगे यांचे आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याला ज्येष्ठ संगीत समीक्षक सुभाषचंद्र जाधव, ज्येष्ठ लेखक मनोहर सप्रे, विनायक कुलकर्णी आणि ज्येष्ठ छायाचित्रकार आनंद चैनी उपस्थित होते. महोत्सवाचे संचालक योगेश बारस्कर यांचीही यावेळी उपस्थिती होती. पुरस्काराबद्दल भावना व्यक्त करताना रामकुमार शेडगे म्हणाले, " 'द ट्रॅप'सारख्या वेगळ्या विषयावरील वेब सिरीजला १३ व्या गोवा शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार मिळणे, ही माझ्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. या कलाकृतीसाठी मेहनत घेतलेल्या सर्व कलाकारांचे आणि तंत्रज्ञांचे हे यश आहे. वेगळे विषय, आशयपूर्ण कथा आणि प्रयोगशील मांडणीच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर नवनवीन कलाकृती आणण्याचा माझा प्रयत्न यापुढेही सुरू राहील."